
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा



वर्ष बाविसावे / अंक १ / जानेवारी २०२१

## संपादकीय

### कहाणी रामानुजनच्या हरवलेल्या वह्यांची

श्रीनिवास रामानुजन हे एक थोर भारतीय गणिती होते. ३२ वर्षांच्या अल्पायुषात त्यांनी गणितात मोलाची भर घातली. १९१४ ते १९१८ या पाच वर्षांच्या कालावधीत ते प्राध्यापक जी. एच. हार्डी यांच्या मार्गदर्शनाखाली केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेज मध्ये काम करीत होते. हा काळ त्यांच्या जीवनाचा सुवर्णकाळ म्हणता येईल. प्राध्यापक हार्डी आणि प्राध्यापक लिटलवूड यांच्या सहकार्याने त्यांनी इंग्लंड मधील संशोधन पत्रिकेत आपले काम प्रसिद्ध केले. यशाच्या शिखरावर असताना त्यांच्या प्रकृतीने मात्र त्यांना दगा दिला. तब्येत बरी नसल्याने त्यांना मायदेशी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी त्यांना पहिले महायुद्ध थांबण्याची वाट पाहावी लागली. युद्ध थांबून सगळे सुरळीत झाल्यावर मार्च १९१९ मध्ये रामानुजन केंब्रिज वरून मद्रासला पोहोचले.

पाच वर्षे इंग्लंड मध्ये राहून परतलेले रामानुजन फारच थकलेले होते. २६ एप्रिल १९२० रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. एक वर्षाहून जास्तीचा काळ त्यांनी बिछान्यावरच काढला. त्यांची पत्नी जानकी हिने त्यांची या कालावधीत सुश्रुषा केली. खाटेवर पडल्या पडल्या ते तिच्याकडे लिहिण्यासाठी कागद मागत असत. शरिरात त्राण होता तोपर्यंत ते गणितात गुंतून राहिले. ते रोज कागदावर नवनवीन गणितीय सूत्रे लिहित असत. त्यांची पत्नी जानकी हिने ते सगळे कागद गोळा करून सांभाळून ठेवले. रामानुजन यांच्या मृत्यूनंतर पत्नीने ते सगळे कागद मद्रास विद्यापीठाच्या वाचनालय प्रमुखाकडे सुपूर्द केले. त्याने ते कागद काही दिवस आपल्याकडे ठेवले आणि १९२३ मध्ये केंब्रिजला प्राध्यापक हार्डी यांच्याकडे पाठवून दिले. त्यावेळी प्राध्यापक स्टिफन आणि विल्सन हे रामानुजन यांच्या संशोधनावर काम करीत होते. म्हणून प्राध्यापक हार्डी यांनी ते सगळे कागद त्यांच्याकडे दिले. त्यांनी त्यावर अभ्यास करून बरेचसे संशोधनपर लेख प्रकाशित केले. १९३० घ्या दशकात विल्सन यांचा मृत्यू झाला. प्राध्यापक स्टीफन यांनी आपले काम सुरूच ठेवले. परंतु वृद्धापकाळाने १९४० घ्या दशकात त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर काही वर्षांनी घराची साफसफाई करताना त्यांच्या पत्नीला हे कागद सापडले. ते त्यांनी ट्रिनिटी कॉलेजच्या वाचनालयात पाठवून दिले.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

इसवीसन १९५७ मध्ये मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेने त्या वह्यांची प्रत प्रसिद्ध केली. त्याची एक प्रत प्रिन्स्टन विद्यापीठाच्या वाचनालयात होती. त्यामुळे त्या विद्यापीठातील संशोधक मंडळी रामानुजन यांच्या वह्यांचा आपल्या प्रकाशनात उल्लेख करीत असत. त्यातील एक होते प्राध्यापक ब्रुस बर्न्डट (Bruce Berndt). त्यांनी रामानुजन यांच्या हरवलेल्या वहीची माहिती देणारा एक सविस्तर लेख लिहिला होता. रामानुजन यांच्या हरवलेल्या वह्यांशी संबंधित कामाला खरी गती आली ती इसवीसन १९७६ मध्ये. एका आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी अमेरिकेच्या पेन्सिल्वेनिया विद्यापीठात काम करणारे गणिताचे प्राध्यापक जॉर्ज ॲन्ड्रूज इंग्लंडला आले होते. त्यांना रामानुजन यांच्या कामाबद्दल पुसटशी माहिती होती. परिषद संपल्यावर ते केंब्रिजला गेले. त्यांनी ट्रिनिटी कॉलेजला भेट दिली आणि सहज म्हणून कॉलेजच्या हेर्न वाचनालयात चक्कर मारायला गेले. तिथे गणित विभागात असलेली पुस्तके बघत असताना त्यांचे लक्ष एका वहीकडे गेले. ती वही चाळताना ती साधीसुधी वही नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्यातील घटकांवर नजर टाकताना त्यांचे डोळे दिपले. अलिबाबाची गुहाच आपल्याला मिळाली असे त्यांना वाटले. या घटकांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे याची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. आपले उर्वरित आयुष्य याच कामात खर्ची घालण्याचे त्यांनी ठरविले. त्या वहीत असलेल्या १३७ पानांच्या प्रती त्यांनी वाचनालयातून प्राप्त केल्या. अनेक वर्षे परिश्रम करून रामानुजनच्या लेखनातला मतितार्थ उलगडून सांगण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यांच्या या अथक परिश्रमांतून पाच पुस्तकांची निर्मिती झाली. Ramanujan's Lost Notebooks या नावाने स्प्रिंगर या प्रकाशन संस्थेने या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे.

Ramanujan's Lost Notebooks ही पाच पुस्तकांची मालिका म्हणजे ज्ञानाचे भांडार आहे. रामानुजन यांनी आपले गणितीय विचार वहीत सूत्ररूपाने मांडले होते. ते उलगडून दाखविणे आवश्यक होते. त्याचबरोबर रामानुजनने मांडलेल्या सिद्धांताची तार्किक सिद्धता करणे आवश्यक होते. हे काम प्राध्यापक ॲन्ड्रूज यांनी केले. त्यामुळे या ग्रंथांना गणित क्षेत्रात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. २६ एप्रिल १९२० रोजी रामानुजन यांचा मृत्यू झाला. त्या घटनेला एक शतक पूर्ण झाले. त्या निमित्ताने विज्ञान प्रसार या संघटनेने २६ एप्रिल ते २२ डिसेंबर २०२० या कालावधीत रामानुजन यात्रेचे आयोजन केले होते. रामानुजन यांच्या कार्याशी संबंध असलेल्या देशी तसेच विदेशी तज्ज्ञांना या यात्रेत व्याख्यान देण्यासाठी पाचारण करण्यात आले. त्यापैकी एक वक्ते होते प्राध्यापक जॉर्ज ॲन्ड्रूज. त्यांनी आपले अनुभव सविस्तरपणे विशद केले होते. त्या व्याख्यानातून रामानुजन यांच्या कार्याचा आवाका किती मोठा होता याची चांगली कल्पना मला आली. या महान गणितज्ज्ञास शतशः प्रणाम.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष बाविसावे/अंक ७/जानेवारी २०२१**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २५ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | डॉ. शांती स्वरूप भटनागर | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | इस्रायल अभ्यास दौरा : उद्बोधक अनुभव | श्री. प्रसाद चिक्षे | ९ |
| ४) | सॅम्युअल बेकेटच काय करायचं? | प्रा. डॉ. आनंद कुलकर्णी | १३ |
| ५) | अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक पद्धत | प्रा. सुनिल नागरे | १७ |
| ६) | किल्ले बल्लारपूर | श्री. दिलीप नारायण वंडलकर | १८ |
| ७) | तलावाचे मनोगत | श्री. अुत्तम भास्कर जोशी | २२ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २६ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# डॉ. शांती स्वरूप भटनागर

*भारतातील स्वातंत्र्योत्तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाची पायाभूत संरचना तयार करण्यात, तसेच भारताचे 'विज्ञान आणि तंत्रज्ञान धोरण' ठरवण्यात डॉ. शांती स्वरूप भटनागर यांनी एक लक्षणीय भूमिका बजावलेली आहे. अशा महान शास्त्रज्ञाच्या कार्याचा परिचय या लेखात केला आहे - संपादक*




**(जन्मः २१-०२-१८९४, मृत्यूः ०१-०१-१९५५)**

'विविध क्षेत्रांत विख्यात असलेल्या अनेक प्रमुख व्यक्तींशी माझा नेहमीच संबंध येत असतो. मात्र डॉ. भटनागर हे अनेक गोष्टींचा एक विशेष संयोग होते. गोष्टी साध्य करण्याचा त्यांचा उत्साह आणि ऊर्जा तर प्रचंडच होती. परिणामी त्यांनी साध्य केलेल्या खरोखर लक्षणीय गोष्टींचा ठसा उमटून राहिलेला आहे. वस्तुतः आज राष्ट्रीय प्रयोगशाळांची जी साखळी आपल्याला दिसते आहे ती डॉ. भटनागर यांच्यावाचून दिसली नसती असे म्हणता येईल.'

– पंडित जवाहरलाल नेहरू

भारतातील स्वातंत्र्योत्तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाची पायाभूत संरचना तयार करण्यात, तसेच भारताचे 'विज्ञान आणि तंत्रज्ञान धोरण' ठरवण्यात; डॉ. होमी जहांगीर भाभा, प्रशांतचंद्र महालनोबिस, विक्रम अंबालाल साराभाई आणि इतरांसोबतच शांती स्वरूप भटनागर यांनी एक लक्षणीय भूमिका बजावलेली आहे. भटनागर हे, 'वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे' (सी.एस.आय.आर.- कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च) संस्थापक संचालक होते. स्वातंत्र्योत्तर भारतातील संशोधनास वाहिलेली ही प्रमुख संस्था ठरली. ते विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्षही राहिले होते.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे ते सचिव होते. तसेच भारत सरकारचे शैक्षणिक सल्लागारही होते. 'शास्त्रीय मनुष्यबळ समितीचा अहवाल-१९४८' तयार करण्यात त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली. इथे हे नोंदवले पाहिजे की, राष्ट्रीय शास्त्रीय मनुष्यबळाच्या आवश्यकतांच्या, सर्व पैलूंनी केलेल्या, प्रणालीबद्ध मूल्यमापनाचा हा पहिलाच प्रसंग होता. स्वातंत्र्योत्तर भारतातील संशोधनास आवश्यक असलेल्या विज्ञान आणि तंत्रज्ञान यांतील पायाभूत सुविधांच्या नियोजनाकरता हा अहवाल खूपच मोलाचा आणि उपयुक्त ठरला. १९२१ ते १९४० दरम्यान भटनागर हे विद्यापीठात प्राध्यापक राहिले होते. प्रथम बनारस हिंदी विद्यापीठात आणि नंतर पंजाब विद्यापीठात अत्यंत प्रेरक शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. ते स्वतःही आपल्या शिक्षकाच्या भूमिकेबाबत अत्यंत सुखी होते.

'पायसांचे (इमल्शनांचे) चुंबकीय आणि भौतिकी रसायनशास्त्र' या विज्ञान शाखेतील त्यांचे संशोधनात्मक योगदान सर्वदूर मान्यताप्राप्त आहे. त्यांनी उपायोजित रसायनशास्त्रातही लक्षणीय काम केलेले आहे. भारतातील राष्ट्रीय संशोधन विकास महामंडळ (नॅशनल रिसर्च

डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) स्थापन करण्यात त्यांनी कळीची भूमिका निभावलेली आहे. संशोधन आणि विकास यांतील दरी बुजवण्याचे कार्य हे महामंडळ करत असते. देशातील औद्योगिक संशोधन संघटना चळवळ म्हणून सुरू करण्यास तेच कारणीभूत होते. देशात तेलशुद्धीकरण कारखाने सुरू व्हावेत याकरता, तेल कंपन्यांशी वाटाघाटी करण्यासाठी १९५१ साली त्यांनी एका एकसदस्यीय आयोगाची स्थापना केली. अंतिमतः याचेच पर्यवसान पुढे देशाच्या अनेक भागांत तेल शुद्धीकरण कारखान्यांची स्थापना होण्यात झाले. त्यांनी अनेक व्यक्ती आणि संघटनांना देशातील विज्ञान शिक्षणासाठी मुक्तहस्ते देणग्या देण्यास प्रेरित केले. त्यांना विशेषत्वाने उर्दू शायरीत रुची आणि गतीही होती.

सध्या पाकिस्तानात असलेल्या पंजाबातील शापूर जिल्ह्यातील भेरा गावात २१ फेब्रुवारी १८९४ रोजी त्यांचा जन्म झाला. शांती स्वरूप यांनी मॅट्रिकची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आणि विद्यापीठाची शिष्यवृत्तीही प्राप्त केली. १९११ मध्ये नव्याने सुरू झालेल्या दयालसिंग महाविद्यालयात ते रुजू झाले. इथे ते महाविद्यालयातील प्रा.पी.ई.रिचर्डस् यांच्या पत्नी मिसेस नोरा रिचर्डस यांनी स्थापन केलेल्या सरस्वती स्टेज सोसायटीचे सक्रिय सदस्य झाले. मिसेस रिचर्डस यांच्या प्रोत्साहनाने त्यांनी 'करामती' नावाची उर्दू एकांकिका लिहिली. तिच्या इंग्रजी भाषांतरास सरस्वती स्टेज सोसायटीचे १९१२ च्या सर्वोत्तम नाटकाचे पारितोषिक मिळाले. त्यांच्या पुढील जीवनातही त्यांनी आपली ही साहित्यिक अभिरुची कायम ठेवली. त्यांच्या पत्नीच्या मृत्यूनंतर तिच्या स्मरणार्थ त्यांनी आपला उर्दू कवितांचा संग्रह प्रकाशित केला. त्याचे नाव होते 'लाजवंती'.

१९१३ साली त्यांनी पंजाब विद्यापीठाची इंटरमेडिएट परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आणि बी.एस.सी. साठी फोर्मन ख्रिश्चन कॉलेजात रुजू झाले. त्यावेळी डॉ.जे.सी.आर.ईविंग हे प्राचार्य होते. हेच पुढे सर जेम्स ईविंग झाले. अनेक वर्षे ते पंजाब विद्यापीठाचे कुलगुरूही राहिले. इथे शांती स्वरूप हे भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र शिकले. त्यांनी भौतिकशास्त्रातील ऑनर्सचा अभ्यासक्रम निवडला. भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते ऑर्थर हॉली क्रॉम्प्टन (१८९२-१९६२) यांचेसोबत संशोधन करणारे जे.एम.बेनेड, हे त्यांना भौतिकशास्त्र शिकवत असत. इथे हे नोंदवले पाहिजे की शांती स्वरूप यांनी त्यांच्या एम.एस.सी. पदवी करतानाचे, 'पृष्ठीय तणाव (सरफेस टेन्शन)' विषयातील त्यांचे पहिलेच संशोधन कार्य हे, बेनेड यांच्या मार्गदर्शनाखालीच केले. पी.कार्टर स्पीर्स त्यांना रसायनशास्त्र शिकवत असत. स्पीर्स हे विद्यापीठात तंत्रशिक्षणाचे जनक मानले जात असत.

श्री. वेलिंगकर, प्रिन्सिपॉल दयाल कॉलेज, जे पुढे सार्वजनिक शिक्षण संचालक (डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन) झाले, ते लिहितात, 'शांति स्वरूप हे सुमारे १०० विद्यार्थ्यांच्या वर्गातील सर्वात समर्थ विद्यार्थी होते. वस्तुतः मला तर वाटते की, सर्वच बाबतींत ते सर्वात समर्थ होते. साहित्यिक, वैज्ञानिक, सामाजिक अशा वर्गातील अभ्यासाच्या प्रत्येक शाखेत आपल्या सर्वोत्कृष्ट वर्तनाने त्यांनी सर्वच अध्यापकांना संपूर्ण समाधान दिले. ते अपवादात्मक सामर्थ्ये असलेले तरुण होते. मला विश्वास वाटतो की, नामांकित युरोपिअन वा अमेरिकन वैज्ञानिक संशोधन केंद्रात त्यांना बुद्धिमत्ता विकासाची संधी मिळाली तर ते विज्ञानात लक्षणीय कामगिरी करून दाखवतील आणि देशास उच्च प्रतीची सेवाही देऊ शकतील.'

१९१६ साली स्नातक पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी, फोर्मन ख्रिश्चन कॉलेजातच भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र विभागांत प्रात्यक्षिककार (डेमॉन्स्ट्रेटर) म्हणून औपचारिकरित्या पहिल्या सेवेत रुजू होण्याचा निर्णय

खरं आणि खोटं यात केवळ चार बोटांचं अंतर आहे. आपण कानांनी ऐकतो ते खोटं आणि डोळ्यांनी पाहतो ते खरं!

घेतला. पुढे ते दयालसिंग कॉलेजात वरिष्ठ प्रात्यक्षिककार झाले. ही सेवा करत असूनही, उच्च शिक्षण घेण्याच्या त्यांच्या प्रयत्नांत मात्र कोणतीच अडचण आली नाही. फोर्मन ख्रिश्चन कॉलेजच्या रसायनशास्त्रातील एम.एस.सी. अभ्यासक्रमाकरता ते रुजू झाले. १९१९ साली त्यांना ही पदवीही प्राप्त झाली.

रुची राम सहाय यांच्या पुढाकाराने भटनागर यांना दयालसिंग कॉलेज ट्रस्टतर्फे परदेशी अभ्यासाकरता शिष्यवृत्ती देण्यात आली. शिष्यवृत्ती घेऊन ते इंग्लंडमार्गे अमेरिकेस रवाना झाले. त्या काळात युरोपातून अमेरिकेत परतत असलेल्या अमेरिकन सैनिकांनी सर्व प्रवासी सुविधा व्यापून राहिलेल्या असल्याने, अमेरिकेत जाणाऱ्या जहाजात त्यांना प्रवेश मिळणेच अशक्य झाले. ट्रस्टींना हे कळवल्यावर त्यांनी लंडनमध्येच पदव्युत्तर संशोधन करण्यास अनुमती दिली. भटनागर यांनी, युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडन येथील प्रोफेसर एफ.जी. डोनान यांना आपल्या संशोधनाची कागदपत्रे सादर केली. लंडन युनिव्हर्सिटीच्या डी.एस.सी. पदवीकरता त्यांनी मार्गदर्शन करण्याचे मान्य केले. १९२१ मध्ये भटनागर यांना ही पदवीही प्राप्त झाली. डोनान यांच्या संशोधनातील सदस्य म्हणून ते पायसांतील आसंजन आणि संसंजन (अधेशन अँड कोहेशन इन इमल्शन्स) या विषयाचा अभ्यास करत होते. त्यांच्या शोधनिबंधाचे शीर्षक होते, 'तेलातील दोन वा तीन संयुजेचे मेदाम्ल-क्षार आणि त्यांचे तेलाच्या पृष्ठीय ताणावरील प्रभाव (सोल्युबिलिटीज ऑफ बाय अँड ट्राय व्हॅलंट सॉल्टस ऑफ फॅटी ऍसिडस इन ऑईल्स अँड देअर इफेक्टस ऑन सरफेस टेन्शन ऑफ ऑईल्स). लंडनमध्ये कार्यरत असताना त्यांना दरसाल २५० पौंडांची डी.एस.आय.आर. इंग्लंड यांची फेलोशिपही मिळत असे.

ऑगस्ट १९२१ मध्ये ते भारतात परत आले आणि रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून बनारस हिंदू विद्यापीठात रुजू झाले. बनारस हिंदू विद्यापीठ १९१६ सालीच पंडित मदन मोहन मालवीय यांनी स्थापन केलेले होते. ते तिथे तीन वर्षे राहिले. तेवढ्या अल्पावधीतच ते भौतिकी-रसायनशास्त्र संशोधन शाखा स्थापन करू शकले होते, सक्रिय राखू शकले होते. याच काळात त्यांनी विद्यापीठाचे 'कुलगीत'ही लिहिले. विद्यापीठाचे कुलगुरू एन.एच. भगवती म्हणाले होते की, 'तुमच्यापैकी अनेकांना हे माहीतही नसेल की, विख्यात शास्त्रज्ञ असलेले प्रा. भटनागर विख्यात हिंदी कवीही होते. बनारसमध्ये असतांनाच त्यांनी विद्यापीठाचे 'कुलगीत'ही लिहिले होते. या विद्यापीठात प्रा. भटनागरांकडे आदरानेच पाहिले जाते आणि विद्यापीठ अस्तित्वात असेपर्यंत ही भावना अशीच टिकून राहील.'

नंतर विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक आणि विद्यापीठ रसायनशास्त्र प्रयोगशाळांचे संचालक म्हणून नियुक्ती झाल्याने ते लाहोरला गेले. पंजाब विद्यापीठ, लाहोर येथे ते १६ वर्षे राहिले. हा काळ त्यांच्या आयुष्यातील सर्वाधिक सक्रिय मौलिक शास्त्रीय संशोधनाचा होता. त्यांच्या अभ्यासाचे प्रमुख विषय कलिल (कोलाईडल) आणि चुंबकीय रसायनशास्त्र हे होते. १९२८ मध्ये के. एन. माथूर यांच्या सोबतीने त्यांनी एका उपकरणाचा शोध लावला. त्याचे नाव भटनागर-माथूर चुंबकीय व्यतिकरण संतुलक (मॅग्नेटिक इंटरफिअरन्स बॅलन्स). चुंबकीय गुणधर्मांचे मापन करण्यासाठीचे हे सर्वाधिक संवेदनशील उपकरण होते. १९३१ साली ते 'रॉयल सोसायटी सांध्यमिलन' प्रसंगी प्रदर्शितही करण्यात आलेले होते. मेसर्स ऍडम हिल्गर अँड कंपनी, लंडन यांनी त्याचे विपणन केलेले होते.

त्यांनी उपायोजित आणि औद्योगिक रसायनशास्त्रातही लक्षणीय काम केलेले आहे. भटनागर यांनी हाती घेतलेली पहिली औद्योगिक समस्या, ऊसाच्या

---

खरे बोलण्याचा एक दुय्यम फायदा असा होतो की, आपण कोणाशी काय बोलतो हे लक्षात ठेवण्याची गरज नसते!

चिपाडांपासून पशुखाद्य तयार करण्याची प्रक्रिया विकसित करणे हीच होती. पंजाबमधील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व असलेले सर गंगाराम यांच्याकरता त्यांनी हे कार्य केले होते. दिल्ली क्लोथ मिल्स; जे. के. मिल्स लिमिटेड, कानपूर; गणेश फ्लोअर मिल्स लि., लयल्लापूर; टाटा ऑईल मिल्स लि., बॉम्बे; स्टील ब्रदर्स अँड कंपनी लि., लंडन इत्यादींच्या औद्योगिक समस्याही त्यांनी हाती घेतलेल्या होत्या. उपायोजित आणि औद्योगिक रसायनशास्त्रातील त्यांचे एक महत्त्वाचे श्रेयसंचित म्हणजे त्यांनी अटॉक ऑईल कंपनी, रावळपिंडी (मेसर्स स्टील ब्रदर्स अँड कंपनी लि., लंडन यांची ही प्रतिनिधी कंपनी होती) यांचेकरता केलेले काम. अटॉक ऑईल कंपनी विंधनकार्य (ड्रिलिंग ऑपरेशन्स) करत असतांना त्यांना एक विचित्रच समस्या समोर आली. विंधनाकरता जो चिखल वापरला जात असे तो खाऱ्या पाण्याच्या संपर्कात येताच घनीभूत होत असे. तो घन पदार्थही पुढे कठीण कठीणच होत जाई. चिखलाच्या अशा घनीभवनामुळे विंधनकार्य अशक्यच झाले.

भटनागर यांच्या लक्षात आले की, ही समस्या कलिल रसायनशास्त्रातील आहे. त्यांनी ती समस्या सोडवण्याकरता एक पद्धती विकसित केली. विंधन चिखलात भारतीय गोंदाची भर करून ही समस्या व्यवस्थितरित्या सोडवली गेली. चिखल संधारणात (मड सस्पेन्शन) गोंद घातल्यावर त्याची विष्यन्दता (व्हिस्कॉसिटी) घटते. विद्युत अपघटकाच्या कणसंकलक (ऊर्णक) प्रभावाप्रतीची स्थिरताही वाढते. भटनागरांनी विकसित केलेल्या पद्धतीवर, मेसर्स स्टील ब्रदर्स एवढे खूश झाले की, त्यांनी भटनागरांना पेट्रोलियमसंबंधी त्यांच्या कोणत्याही संशोधनाकरता रु.१,५०,०००/- देऊ केले. भटनागरांच्याच सांगण्यावरून कंपनीने ही रक्कम विद्यापीठाच्या अखत्यारीत ठेवली. भटनागरांच्या मार्गदर्शनाखाली पेट्रोलियम संशोधन विभाग स्थापन करण्यास, या अनुदानाचा उपयोग झाला. त्यांच्या सहयोगी योजनेखाली मेणांच्या निर्गंधीकरणार्थचे तपास, मातीच्या तेलाच्या ज्योतीची उंची वाढवण्याकरताचे तपास, खाद्य तेलातील तसेच खनिज तेल उद्योगांतील वाया जाणाऱ्या पदार्थांच्या वापराकरताचे तपासही कार्यान्वित करण्यात आले. सहयोगी योजनेचे व्यापारी महत्त्व ओळखून कंपनीने अनुदान वाढवले. संशोधनाकरताचा कालावधीही पाच वर्षांपासून दहा वर्षांपर्यंत वाढवून दिला.

भटनागरांनी त्यांच्या उपायोजित औद्योगिक रासायनिक संशोधनार्थ मिळालेले आर्थिक लाभ, विद्यापीठातील सुविधा सशक्त करण्यास उपयुक्त होतील या कारणाने, स्वतःच्या पदरात पाडून घेण्यास सातत्याने नकारच दिला. त्यांच्या या त्यागाकडे दूरपर्यंत लोकलक्ष वेधले गेले. मेघनाद साहा यांनी १९३४ साली भटनागरांना लिहिले की, 'तुम्ही पूर्वी काम केलेत त्या संस्थेस मिळालेले लाभ तर आहेतच. शिवाय यामुळे तुम्ही जनसामान्यांच्या नजरेत विद्यापीठीय शिक्षकांचा दर्जा उंचावला आहे.'

के.एन. माथूर यांचेसोबत मिळून भटनागरांनी 'फिजिकल प्रिन्सिपल्स अँड ॲप्लिकेशन्स ऑफ मॅग्नेटो-केमिस्ट्री' नावाचे पुस्तकही लिहिले आहे. हे पुस्तक या विषयावरील प्रमाणपुस्तक मानले जाते. प्रफुल्लचंद्र रे लिहितात, ''माझे डोळे, 'नेचर' या नियतकालिकाची पाने उलटतांना, मॅक्मिलन यांच्या जाहिरातीवर खिळले. अखेरीस तुमचे पुस्तक जाहीर झालेले होते. एक समर्थ निर्णायक असलेल्या प्रा. स्टोनर यांच्या, 'करंट सायन्स' नियतकालिकातील सर्वोत्तम परीक्षणात सुचित झाल्याप्रमाणे हे पुस्तक उच्च दर्जाचे आहे. माझ्या माहितीनुसार परकीय विद्यापीठांनी अनुसरलेले भौतिक विज्ञानांतील एकमेव पाठ्यपुस्तक मेघनाद यांचे आहे. भौतिक विज्ञानांतील हे दुसरे पुस्तक तसाच सन्मान

मिळवेल असे दिसते आहे, ही माझ्याकरता आनंददायी गोष्ट आहे. माझे दिवस आता मोजकेच राहिलेले आहेत. त्यात समाधान हे आहे की, तुम्ही रसायनशास्त्रात भारतीय संशोधकांचा सन्मान परदेशांतही उंचावत आहात.''

ब्रिटिश सरकारने १९३४ मध्ये भारतीयांना एक छोटी सवलत देण्याचा निर्णय घेतला. 'औद्योगिक गुप्तवार्ता आणि संशोधन कार्यालय' निर्माण करण्यास सरकार तयार झाले. ते एप्रिल १९३५ मध्ये भारतीय भांडार विभागांतर्गत कार्यान्वितही झाले. त्याचेपाशी मर्यादित संसाधने उपलब्ध होती. दरसाल एक लक्ष रुपयांचे त्याचे अंदाजपत्रक असे. त्यामुळे त्यास कोणतीही औद्योगिक कार्यवाही करणे शक्य नव्हते. ते मुख्यतः चाचणी आणि गुणवत्ता नियमनाशी संबद्ध राहात असे.

जेव्हा दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा हे कार्यालय बंद करण्याचा प्रस्ताव आला. व्यापार सदस्य सर रामस्वामी मुदलियार यांनी हा प्रस्ताव स्वीकारत असतांना असा युक्तिवाद केला की, 'जुने कार्यालय बंद करावे. मात्र काटकसरीचा उपाय म्हणून नव्हे, तर बोर्ड ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च(बी.एस.आय.आर.)' या विस्तृत संसाधनांसहित आणि विस्तृत उद्दिष्टांसहित येणाऱ्या नव्या कार्यालयास जागा करून देण्यासाठी. मुदलियार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश येऊन १ एप्रिल १९४० रोजी दोन वर्षांकरता बी.एस.आय.आर. निर्माण झाले. तोपर्यंत रसायनशास्त्रात लक्षणीय योगदान दिलेल्या भटनागर यांना, त्याचा कार्यभार उचलण्यासाठी पाचारण केले गेले. भटनागर यांना वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन संचालक म्हणून आणि सर मुदलियार यांना अध्यक्ष म्हणून नियुक्त केले गेले. बी.एस.आय.आर.ला वार्षिक पाच लाख रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर केले गेले आणि व्यापार विभागाकडे त्यास वर्ग करण्यात आले. १९४० अखेरपर्यंत सुमारे ८० संशोधक, बी.एस.आय.आर. मध्ये घेतले गेले होते. त्यातील सुमारे एक चतुर्थांश थेट नियुक्त होते. बी.एस.आय.आर.च्या स्थापनेनंतर दोन वर्षांतच त्यांनी अनेक प्रयोगशालेय पातळीवरील प्रक्रिया, औद्योगिक वापरार्थ सिद्ध केल्या.

बलुचिस्तान गंधक शुद्धीकरण, वायुविरहित कापड निर्मिती, वनस्पतीज तेलांचा इंधन व वंगण म्हणून विकास, पायरेथ्रम (पायसन आणि दुग्धसारणाचा) इमल्सिफायर अँड क्रीमचा शोध, लष्करी जोडे आणि दारूगोळ्याकरता अप्रत्यास्थ बांधणीसाहित्य (प्लॅस्टिक पॅकिंग), गणवेषांकरताचे रंग, जीवनसत्त्वाची निर्मिती इत्यादीकरताच्या तंत्रांचा त्यांत समवेश होता.

१९४१ च्या सुरुवातीस भटनागर यांनी, ह्या तंत्रनिष्पत्तीचे उपायोजनांत परिवर्तन व्हावे म्हणून औद्योगिक संशोधन उपयोग समिती (आय.आर.यू.सी) स्थापन करण्यासाठी सरकारचे मन वळवले. समितीच्या शिफारसीवरून, उद्योगातून लाभणाऱ्या स्वामित्वाचा एक हिस्सा औद्योगिक संशोधनातील पुनर्निवेषार्थ वेगळा काढण्यास सरकार तयार झाले. मुदलियार यांनी दिलेल्या एका प्रस्तावानुसार 'इंडस्ट्रिअल रिसर्च फंड' निर्माण केला गेला. देशातील औद्योगिक विकासास त्यामुळे चालना दिली जाणार होती. दिल्लीतील मध्यवर्ती सभेकडून दरसाल दहा लाख रुपयांची तरतूदही याकरता मंजूर करण्यात आली.

मुदलियार आणि भटनागर यांच्या प्रयत्नांतून 'वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद' (कौन्सिल फॉर सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च-सी.एस.आय.आर.) ही एक स्वायत्त संस्था उभी राहिली. ती सरकारने निर्मिलेल्या संशोधन निधीचे नियंत्रण करणार होती. २८ सप्टेंबर १९४२ रोजी ती कार्यान्वित झाली. सी.एस.आय.आर. या नियंत्रक संस्थेस सल्लागार म्हणून बी.एस.आय.आर. आणि आय.आर.यू.सी. यांची

नियुक्ती करण्यात आली. १९४३ मध्ये भटनागर यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार, पाच राष्ट्रीय प्रयोगशाळा स्थापन करण्याच्या प्रस्तावास सी.एस.आय.आर.च्या प्रशासकीय मंडळाने मंजुरी दिली. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, राष्ट्रीय भौतिकी प्रयोगशाळा, इंधन संशोधन स्थानक, तसेच 'ग्लास अँड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिट्यूट' यांचा त्यांत समावेश होता. १९४४ मध्ये या प्रयोगशाळांच्या निर्मितीकरता सी.एस.आय.आर.ला एक कोटी रुपयांचे अनुदान मिळाले. टाटा इंडस्ट्रिअल हाऊसनेही याकरता वीस लाख रुपयांची देणगी दिली.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद' (कौन्सिल फॉर सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च-सी.एस.आय.आर.) पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे अखत्यारीत ठेवली गेली. ते स्वतः देशात विज्ञानाचा विकास व्हावा यासाठी खूप उत्साही होते. १९५४ अखेर बारा राष्ट्रीय प्रयोगशाळा स्थापन झाल्या आणि आणखी डझनभर नियोजन अवस्थेत होत्या.

१९३६ मध्ये ब्रिटिश सरकारने, शुद्ध आणि उपायोजित रसायनशास्त्रांतील भटनागरांच्या सर्वोत्तम योगदानांच्या गौरवार्थ त्यांना 'ऑर्डर ऑफ ब्रिटिश एम्पायर (ओ.बी.ई.)' किताब दिला. १९४१ मध्ये त्यांना, त्यांच्या युद्धकालीन प्रयासांच्या मान्यतेखातर 'सर' किताब देण्यात आला. १९४३ साली 'सोसायटी ऑफ केमिकल इंडस्ट्री, लंडन' या संस्थेने भटनागर यांना सन्माननीय सदस्य निवडले आणि पुढे उपाध्यक्षही केले. १९४३ साली 'रॉयल सोसायटी ऑफ लंडन' मध्ये ते फेलो म्हणून निवडले गेले. भारतीय रसायनशास्त्र संघटनेचे ते अध्यक्ष होते. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस ऑफ इंडिया आणि इंडियन नॅशनल काँग्रेसचेही ते अध्यक्ष होते. भारत सरकारने १९५४ साली त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना पद्मविभूषण सन्मान दिला. १९९४ साली त्यांचे प्रकाशचित्र असलेले डाकतिकीटही जारी करण्यात आले. १ जानेवारी १९५५ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

भारताच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर लगेचच्या काळात, आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने भारतातील वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधनास गतीमान करणाऱ्या, या स्वभावाने शिक्षक असलेल्या, आधुनिक महर्षींस हा मानाचा मुजरा! त्यांच्या कर्तृत्वाचे आम्हाला कधीही विस्मरण होऊ नये आणि त्यांच्या नीतिमत्तेने आम्हाला कायमच प्रेरित करत असावे हीच प्रार्थना!!

**संदर्भः**


१. शांती स्वरूप भटनागर यांचा अल्प परिचय
https://vigyanprasar.gov.in/bhatnagar-shanti-swarup/

२. लाजवंती, शांती स्वरूप भटनागर, प्रकाशनकाल- १९४६, पृष्ठे-२१४
https://www.rekhta.org/ebooks/lajwanti-shanti-swaroop-bhatnagar-ebooks



**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com


•••



गरिबाने दिलेला पैसा एक हजार रुपयाहून अधिक मोलाचा आहे, कारण गरिब परिस्थितीतही दान करण्याची इच्छा होणे यातच त्याचे मोठेपण आहे!

# इस्रायल अभ्यास दौरा : उद्बोधक अनुभव

*अंबाजोगाई येथील ज्ञानप्रबोधिनीच्या कामाची धुरा सांभाळणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रसाद चिक्षे यांच्या इस्रायल देशाच्या अभ्यास दौऱ्यातील अनुभव विशद करणारा लेख – संपादक*

**भाग १**

खूप शिकावे व भरपूर पैसे मिळवण्यासाठी परदेशात जावे असे समजत्या वयात वाटत होते. पुढे परदेशात शिकण्यासाठी जावे व त्यासाठीचे प्रयत्न पण झाले. असे स्वप्न पाहात असतानाच आयुष्याची दिशा बदलली. 'अ' अमेरिकेचा तो 'अ' अरुणाचलचा कधी झाला हे कळलेच नाही. वर्षभर कन्याकुमारी व त्यानंतर चार वर्षे अरुणाचल असे भारतातील अगदी नयनरम्य भागात राहणे झाले.

कन्याकुमारीतील खवळणाऱ्या अथांग महासागरातून हिरण्मयाचे आरोहण प्रचंड ऊर्जा देऊन जायचे. रात्री दर्याच्या आलापात झोप कधी लागायची ते कळायचे पण नाही. भारताचे दक्षिण टोक ते अगदीच भारताचे ईशान्य टोक; आसमंतात प्रचंड बदल होता. अरुणाचा उदय होत असताना सोनेरी होणाऱ्या हिमालयाच्या डोंगररांगा. हिरव्यागार घनदाट अरण्याच्या अपार शांततेला आपल्या निखळ आणि मंजुळ नादाने अनोख्या भावविश्वात नेणाऱ्या प्रचंड वेगाने वाहणाऱ्या सरिता. इतरत्र सगळा भारत सकाळच्या साखर झोपेत असताना अरुणाचलात मात्र आदित्य सर्वांनाच कार्यप्रवण करण्यासाठी आपला आविष्कार सर्वदूर करत आसमंत उजळून टाकतो. प्रत्येक दिवस नवीन अनुभव आणि अनुभूतीचा.

देखणा निर्सग व कामाचे प्रचंड आव्हान यात स्वत्व हरपून जाई. कुठले इतर खास पर्यटन करण्याची गरजच भासली नाही. अरुणाचलहून अंबाजोगाईला परतलो ते अभ्यास व कामात इतका बुडून गेलो की, माझे विश्वच अंबाजोगाई व परिसर होता. प्रत्येक छोटे मूल व माणूस यांना समजून घेत मेंदूच्या अपार विश्वात ते अनुभवविश्व एक नवीनच गाव निर्माण करत होते. काही तरी करून दाखवण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती व दररोजचे काम करण्यासाठी लागणाऱ्या अगदीच काही रुपये मिळवण्याची धडपड. कार्यक्षेत्र सोडूनचे जग खूप सुंदर असते, खूप विकसित असते, नव्यानव्या भव्य आविष्काराने सजलेले असते असे स्वप्न पण कधी पडलेच नाही.

सकाळच्या न्याहारीच्या वेळी सुनीलजी गोयल सहज म्हणाले,

'' सादजी आप परदेस गये है क्या ?''

''नहीं भाईसाब। अपने पास समय ही कहाँ है ?''

''जायचे असेल तर कोणत्या देशात जाणे पसंत कराल ?''

क्षणाची पण उसंत न घेता म्हणालो, '' इस्रायल !!''

''अरे तुमचा आणि माझा आवडता देश तर एकच निघाला !!''

पुढचे तासभर आम्ही इस्रायलच्या गप्पात पूर्ण बुडून गेलो. कन्याकुमारीच्या प्रशिक्षणात आम्हाला दाखवलेला Victory at Entebbe हा चित्रपट आणि त्यानंतरची गट चर्चा. यातून इस्रायलशी अपार सख्य जुळले.

---

जर कधी कोणी तुमचं मन तोडलं तर निराश होऊ नका; कारण हा निसर्गाचा नियम आहे!!! ज्या झाडावर गोड फळं असतात त्याच झाडावर लोक जास्त दगड मारतात!!

सुनीलजी म्हणजे मुलखावेगळा माणूस. त्यांच्या विचारांचा आणि क्षमतांच्या ताकदीचा सहजासहजी अंदाज येणे अशक्य.

''मग ठरवले आपण मिळून पुढच्या वर्षी इस्रायलला जायचे. तुम्ही पासपोर्ट काढून घ्या.'' बोलण्याचा शेवट करत सुनीलजी उठले. मी हसत त्यांना निरोप दिला व आपल्या दररोजच्या कामात मश्गुल झालो.

अचानक एके दिवशी सुनीलजींचा फोन, ''पासपोर्ट तयार है क्या ?''

''अरे भाईसाब आप तो भारी मजाक करते है। मेरे जैसा फटीचर आदमी थोडे ही विदेश जा सकेगा ?'' मी सहज बोलून गेलो.

''अपने को न मार्च में निकलना है। मैंने तिकीट तो निकाल दिया। आप जल्दीसे पासपोर्ट निकालो। समय कम है अपने पास।'' सुनीलजी इतक्या सहजतेने बोलत होते की जसे काही आम्हाला उठून जवळपासच्या गावात मित्राला भेटायला जायचे आहे!

मी मात्र पार उडालो. मला यावर काही बोलताच येत नव्हते. स्वतःच्या भावनांचा आणि विचारांचा अजिबात अंदाज येत नव्हता. मी पासपोर्टच्या कामाला लागलो त्याचसोबत त्या चिमुकल्या अस्तिवाच्या परंतु अफाट कर्तृत्वाच्या देशाचा अभ्यास करण्यात पुरता गढून गेलो. आम्ही चांगले महिनाभर तिथे राहणार होतो. सगळा अभ्यास करून नियोजन करण्याचे काम माझ्यावर होते; तर इतर सगळ्या व्यवस्था करण्याचे काम सुनीलजींनी स्वतःकडे घेतले. अशा प्रकारे शेवटी इस्रायलला आमचे जायचे ठरले. सोबतीला होते लातूरचे संजय कांबळे व जालन्याचे सुरेशराव केसापूरकर.

**भाग २**

**इस्रायल अभ्यास दौरा एक संजीवक आव्हान...**



**पवित्र सोलेमानचे मंदिराचे अवशेष व सुवर्ण घुमट असणारे हजरत पैगंबरांचे जन्नतकडे प्रवास स्थान...जेरुसलेम**

इस्रायलची ओळख शाळेत असतानाच झाली. पोटभरे सर नवीनच शाळेत इंग्रजीचे शिक्षक म्हणून रुजू झाले होते. डेव्हिड व गोलियथचा धडा रंगून शिकवताना इस्रायलच्या छोट्या पण बहादूर डेव्हिडशी एक वेगळेच नाते जुळले. ख्रिसमस आला की रेडिओतून प्रभू येशुच्या गोष्टी ऐकायला मिळायच्या. त्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या गोष्टी ऐकताना इस्रायलची अनेक गावं ओळखीची झाली होती. मुहम्मद पैगंबरांच्या 'जन्नत'च्या यात्रेची सुरवात जेरुसलेम येथेच झाली.



**जेरुसलेम... सोनेरी घुमट जो आहे त्याला 'डोम ऑन द रॉक' असे म्हणतात. हजरत साहेबांनी येथून आपल्या अंतिम यात्रेला सुरुवात केली. इस्लाम धर्माचे तिसरे महत्त्वाचे पवित्र स्थान.**

अडॉल्फ हिटलरच्या भयाण छळ छावण्या व त्यात त्यांनी केलेल्या ज्यू लोकांच्या अमानुष छळाबद्दल वाचताना अंगाचा थरकाप व्हायचा. ६० लक्ष ज्यू लोकांची क्रूर हत्या व त्यातील १५ लाख छोटी मुले. विकृत हिटलरला ज्यू लोकांचा निर्वंश करायचा होता आणि अतिशय क्रूरपणे आपल्या देशाला हजारो वर्षे पारखे झालेले हे यहुदी बांधव जगभर विखुरले. प्रत्येक ठिकाणी त्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले. भारतात मात्र त्यांना मिळालेली वागणूक त्यांच्यासाठी वैशाख वणव्यात शरदाचे चांदणे होती. म्हणूनच की काय ते आपल्याला प्रेमाने 'होदू' म्हणजेच 'प्रिय मित्र' म्हणून संबोधतात!

पुढे महाविद्यालयात गेलो आणि ओळख झाली अल्बर्ट आइनस्टाईनची. जगात सर्वात बुद्धिमान आणि सर्वोत्कृष्ट वैज्ञानिक म्हणून प्रसिद्धी मिळविणारे अल्बर्ट आइनस्टाईनचे मला प्रचंड आकर्षण होते. जगामध्ये केवळ ०.२ % लोकसंख्या असणारे ज्यू २० % नोबेल पारितोषिकाचे मानकरी आहेत! अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना अनेक असामान्य ज्यू शास्त्रज्ञांशी सख्य जुळले. या सोबतच हॉलीवूडचा स्टीफन स्पीलबर्गचा जुरासिक पार्क पाहिला व त्याच्या प्रेमातच पडलो. एका नंतर एक असे त्याचे चित्रपट पाहण्याचा सपाटा लावला.

एक नाही तर अनेक गोष्टी होत्या ज्यांमुळे माझे व इस्रायलचे व तेथील ज्यू लोकांशी भावनिक व वैचारिक ऋणानुबंध होते. कन्याकुमारीला गेलो आणि मग तर त्या देशाची इत्यंभूत माहिती मिळवण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले. इनमीन आपल्या बीड जिल्ह्याच्या दुप्पट क्षेत्र असणारा हा देश जगात आपल्या तेजाने, कर्तृत्वाने, ज्ञानाने व शौर्याने झळाळत आहे. इथला प्रत्येक पुरुष आणि स्त्री हे चांगले योद्धा तर आहेतच; त्यासोबतच ते चांगले शेतकरी, संशोधक आणि व्यापारी आहेत. भारतासारखाच हजारो वर्षांची परंपरा असणारा मध्यपूर्वेतील हा देश आपल्या भोवताली असणाऱ्या प्रचंड शक्तीशाली राष्ट्रांना पुरून उरतोय. २००६ पर्यंत जन्मलेल्या प्रत्येक माणसाने युद्ध अनुभले आहे; तर आताच्या बहुतेक प्रत्येक चाळीशीतील नागरिकांनी प्रत्यक्ष युद्ध लढलेले आहे!



**डेव्हिडचा राजवाडा, स्थापत्यकलेचा सुंदर नमुना जेरुसलेम**

देवाने दिलेल्या आपल्या मधाच्या आणि दुधाच्या भूमीचे अस्तित्वच केवळ ज्यू लोकांनी आपल्या मनात जतन करून ठेवले होते. आपल्या अपार प्रयत्नांनी उरातील स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात आणले. कशी असेल ही मधाची आणि दुधाची भूमी? कशी असेल डेव्हिड, प्रभू येशुची जन्मभूमी? खुंखार व जिगरबाज मोसाद या गुप्तहेरांचा हा देश कसा असेल? भूमध्य समुद्र, तांबडा समुद्र आणि समुद्र सपाटीपासून सगळ्यात खोल असणारा



**भूमध्य सागरी किनारा तेलवीव**

अजब मृत समृद्ध कसा असेल? वाळवंटात नंदनवन फुलवत जगाला शेतीचे नवे आदर्श दाखवणारा हा देश कसा असेल? बदामीचे वाळवंट, जॉर्डन नदी व तिबेरियाचे महाकाय सरोवर व त्यांच्या एका काठाशी असणाऱ्या गोलनच्या टेकड्या कशा असतील? जगातील सगळ्यात अशांत अशा जेरुसलेम मधील आइनस्टाईनने स्थापन केलेल्या विश्वविद्यालयात कसे शिकवले जात असेल? कसे असेल येथील शिक्षण, तरुण आणि राजकारणी? कसा करत असतील आपल्या आयुष्याचा विचार? किबुत्झ व मोशावतच्या नव्या सामूहिक जीवनाचा आविष्कार करत मृतप्राय झालेल्या आपल्या हिब्रू भाषेला पुनर्जीवित करत प्रत्येक आव्हानांना सिंहाच्या छाव्यासारखे सामोरे जाणाऱ्या ह्या बेन इस्रायलींचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा आहे ? अशा अनेक गोष्टी समजून घ्यायच्या होत्या.



**मोशावत सामूहिक शेती करणारी छोटी वसाहत**

आमच्या ओळखीचा एकही इस्रायली माणूस नव्हता. प्रत्यक्ष जायचे कसे? राहायचे कुठे? कोण मदत करणार? आमच्या मनात फक्त प्रचंड इच्छा होती की इस्रायल समजून घ्यायचा. आपल्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहात व आपल्या बुद्धीने समजून घ्यायचा. कुठलाही सरकारी पाहुणा म्हणून फुकटची सहल अनुभवायची नव्हती. सगळेच काही विचित्र होते. फक्त हे घडून आणण्यासाठीची जिगर मात्र प्रचंड वाढत चाललेली होती. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक अडचणी सोडवायच्या व वाट शोधत आपले साध्य गाठायचे हे मात्र आमच्यात भिनत चालले होते. नैराश्य, भयगंड व भयाण चिंतेच्या पार्श्वभूमीवर माझ्यासाठी इस्रायलचा अभ्यासदौरा एक संजीवक आव्हान होते.

(क्रमशः)

**– प्रसाद चिक्षे**
ज्ञान प्रबोधिनी
अंबाजोगाई
भ्रमणध्वनी – ८२०८४३८६००

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# सॅम्युअल बेकेटचं काय करायचं?


*सॅम्युएल बेकेट (१९०६-१९८९) हा इंग्रजी साहित्यातील अत्यंत महत्त्वाचा नाटककार. अस्तित्ववाद या संकल्पनेशी त्याचा जवळचा संबंध. बेकेटचं लिखाण म्हणजे जीवनाची निरर्थकता व्यक्त करणारं, तात्विक, अस्तित्ववादी, विसंगती आणि विरोधातून आशय साकारणारं, खोल, गूढं, साहित्यिक परंपरांना मोडीत काढणारं. त्याच्या लिखाणाविषयी एवढं सगळं बोलूनही ते अनाकलनीय आणि आकर्षक उरतं ते उरतंच. या नाटककारा बद्दल इंग्रजी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख दिशाच्या वाचकांसाठी - संपादक*



काही काही लेखक आणि त्यांच्या साहित्यकृती आयुष्यभरासाठी मनात ठाण मांडून बसतात. आपल्याला ते का आवडतात हे आपण स्वत:लाच पटवून देवू शकत नाही; इतरांचं समाधान होईल अशी चिकित्सा तर खूप लांबची गोष्ट. असे लेखक आणि त्यांचं लिखाण कळत नाही आणि त्यांची ओढ कमी होत नाही. सॅम्युअल बेकेट अशा प्रचंड छळणाऱ्या (कळतही नाही आणि सोडवतही नाही!) लेखकांचा शिरोमणी! बेकेट आणि त्याची नाटकं आणि कादंबऱ्या कळाव्यात यांसाठी ती खूप वेळा वाचली. त्याच्या साहित्यविश्वाचा अंगभूतपणे अस्तित्वात असलेला गुंता सोडवण्याची प्रतिज्ञा केलेल्या अनेक विद्वान समीक्षकांची विश्लेषणं वाचली. पण प्रत्येक वेळी बेकेटचं लिखाण हातून निसटतंय असं वाटत राहात. एखादा समीक्षक त्याच्या लेखनाचे बारकावे हेरून त्याच्या साहित्यकृतीचं सूक्ष्म विश्लेषण करतोय आणि आपल्याला अर्थाच्या खूप जवळ घेऊन जातोय असं वाटत असतानाच दूरवर कुठेतरी बेकेट त्याच्या सु/कुप्रसिद्ध 'Aztec Eagle' (तीव्र संवेदनशील आणि सर्वव्यापी नजर) अँगलमधून आपल्याकडे बघतोय आणि आपल्याला अधिकाधिक नर्व्हस करतोय असं वाटत राहाते. बेकेट आणि त्याचं लिखाणं दोन्हीही tall and remote. आपण short and advancing. त्याच्या लिखणाविषयी अधिक बोलणं म्हणजे संपृक्त आशयाशी अकारण लगट करणं. बेकेटचं लिखाण म्हणजे जीवनाची निरर्थकता व्यक्त करणारं, तात्विक, अस्तित्ववादी, विसंगती आणि विरोधातून आशय साकारणारं, खोल, गूढं, साहित्यिक परंपरांना मोडीत काढणारं. त्याच्या लिखाणाविषयी एवढं सगळं बोलूनही ते अनाकलनीय आणि आकर्षक उरतं ते उरतंच. शिवाय बेकेटचं लिखाण minimalist (अल्पाक्षरी शैली). अफाट आशय व्यक्त करण्यासाठी काटेकोरपणे वापरलेले किमान शब्द. त्यामुळे अधिक बोलणे म्हणजे आशयाशी अनावश्यक केलेली छेडछाड.

मी मध्येच बेकेटवर मराठीतून लिहायचं म्हणून आठ-दहा पानं लिहिली. पण नंतर शब्दांत तो सापडत नाही आणि मावतही नाही असं वाटल्यावरून तो प्रयोग अर्ध्यावर सोडून दिला. खरं तरं बेकेटवर खूप लिहिता येईल आणि शब्दांचे फुलोरे फुलवता येतील. पण बेकेट म्हणजे एव्हरेस्ट आणि एव्हरेस्टवर ज्याचं त्यानं जायचं असतं. सगळ्यांनाच एव्हरेस्टवर जाता येणार नाही, पण त्यामुळे काही बिघडत नाही. कारण एव्हरेस्टच्या माथ्यावर पोहोचलेला आणि पायथ्याशी राहिलेला दोघेही एकटे आणि प्रयोजनाच्या शोधात असतात.

जो माणूस कोणत्याही संकटाला भीत नाही, मृत्यूलाही भीत नाही, तोच माणूस जीवनाची गोडी चाखू शकतो.




**थोडी चिकित्सा...थोडं चिंतन**

सध्या कोविड महामारीमुळे आपण सगळे स्थानबद्ध आहोत. या क्षणी करण्यासारखं काहीच नाही म्हणून थोड्या चिकित्सेचा हा प्रयत्न. (महामारी असेल तर आपण अधिकच चिकित्सा करतो). कधी कधी चिकित्साही हतबलता आणि रितेपणा यांतूनही येते. यांत वेदनेचा समावेश झाला की मग सर्जन होतं. पण तो उन्मेष असलेल्या लेखकांचा प्रांत असतो. समीक्षेला काटेकोर आणि टोकदार असण्याचा शाप असतो. याचा अर्थ समीक्षा सर्जक नसते असा नाही. तीही सर्जक असते पण ती डॉ. सॅम्युअल जॉन्सन सारख्या प्रतिभावंत समीक्षकाच्या हाती. एरव्ही त्यात कोरडा बुद्धीवाद आणि शब्दच्छल असतो. एव्हाना तुमच्या लक्षात आलंच असेल की, आजचं लिहिणं विशेषीकरणाकडे झुकणार आहे, त्यामुळे संदर्भ अटळपणे येणार आणि डोमेन स्पेसिफिक झाल्यामुळे आकलनात अडचण होणार. त्याबद्दल या विषयाशी थेट संबंध नसणाऱ्या वाचकांप्रती दिलगिरी. सॅम्युअल बेकेटच्या मागच्या लेखनावरून मला सहज वाटलं की, अगदीच वेगळी विचारसरणी असलेला एखादा अव्वल दर्जाचा समीक्षक बेकेट आणि त्याच्या लिखाणाकडे कसा बघतो? काही वेगळे अन्वयार्थ लावायचा प्रयत्न करतो? की बेकेटने उभ्या केलेल्या विशाल अस्तित्ववादी angst च्या विवरात अडकून पडतो? मग मला Pascale Casanova या फ्रेंच विदुषीने लिहिलेलं 'Samuel Beckett: Anatomy of a Literary Revolution' हे २००६ मध्ये प्रकाशित झालेलं पुस्तक आठवलं. Casanova ही विख्यात फ्रेंच समीक्षक. Pierre Bourdieu यांच्या मार्गदर्शनाखाली Ph.D. केलेली. तिच्या प्रबंधाचा पुढे 'The World Republic of Literature' या नावाने जगप्रसिद्ध संदर्भ ग्रंथ झाला. बेकेटवरचं तिचं पुस्तक फ्रेंच भाषेत लिहिलेलं. Gregory Elliott नी हे पुस्तक इंग्रजीत अनुवादित केलं. तर मुद्दा हा की, या पुस्तकाला प्रस्तावना आहे Terry Eagleton ची. इगलटन हा विख्यात मार्क्सवादी विचारवंत समीक्षक. मला Theodor Adorno आणि Terry Eagleton हे दोन मार्क्सवादी समीक्षक खूप आवडतात. अडॉर्नो अवघड लिहितो. म्हणजे भाषा आणि आशय अशा दोन्हीही अर्थांनी. बेकेटच्या साहित्यावर आक्षेप घेणाऱ्या समीक्षकांना अतिशय चिकित्सक पद्धतीने अडॉर्नोने जे उत्तर दिले आहे ते त्याच्या अनवट शैली आणि विचारांचं उदाहरण आहे आणि ते मुळातून वाचण्यासारखं आहे. इगलटन खूप वेळा सहज सुंदर लिहितो. अतिशय तरल, आशयसंपन्न शब्दांची गुंफण करत आपला मुद्दा वाचकांच्या गळी उतरवण्यात तो वाकबगार आहे. त्याची इंग्रजी विलक्षण डौलदार, दिमाखदार आणि प्रसन्न आहे. ब्रिटिश लेखक बहुतांशी सुगम, नेटकं आणि स्पष्ट (precise and clear) लिहितात. फ्रेंच आणि जर्मन तात्त्विक आणि चिंतनशील

(reflective, contemplative) लिहितात. तर अमेरिकन लेखक मोकळं, बोधक आणि अर्थपूर्ण (expressive) लिहितात. त्यातही जर्मन reflective तर फ्रेंच self-reflective लिहितात. इगलटनचा विषय निघालाय म्हणून मला हे सांगायचा मोह आवरत नाही की, समीक्षेच्या अभ्यासकाने मार्क्सवादाचा अभ्यास करायलाच पाहिजे. ती बौद्धिक मशागत असते, चिकित्सक दृष्टिकोण तयार व्हायला त्याची मदत होते. त्यामुळे आपण वेगळा विचार करून आपल्यापर्यंत चालत आलेल्या धारणांना प्रश्नांकित करू शकतो. मार्क्सवादाचा स्वीकार/नकार, त्या विचारसरणीविषयी मतभेद असू शकतात आणि तसे ते असायलाही हवेत. पण निदान समीक्षा अभ्यासाची सुरुवात अशा द्वंद्वात्मक चिकित्सेतून व्हायली हवी एवढंच मला म्हणायचंय. अर्थात ही माझी वैयक्तिक मतं आहेत. माझी मतं verifiable - तपासता येण्यासारखी आहेत, veritable– सत्यकथन करणारी आहेतच असं नाही. ती स्वीकारलीच पाहिजेत असा माझा आग्रह नाही. तशीही समीक्षा ही नेहमीच प्रवाही आणि अकुंठित असते. ती अंतिम विधान करत नाही, सर्वमान्य आणि ठोकळेबाज निष्कर्ष मांडत नाही. ती साहित्य प्रवासाची दिशा दाखवते, वाचकांसाठी वाटा उजळायचा प्रयत्न करते.

इगलटनची या पुस्तकाला असलेली प्रस्तावना फक्त पुस्तकाचा गोषवारा देत नाही तर अगदीच वेगळा बेकेट आपल्यापुढे उभा करते. शिवाय मार्क्सवादी आहे म्हणून पारंपरिक मर्यादित मार्क्सवादी दृष्टिकोण स्वीकारून इतर विचारक्षेत्रांना बेदखल करण्याचा करंटेपणा इगलटन विचारपूर्वक टाळतो. ऐतिहासिक समीक्षा (historical criticism) आणि रूपनिष्ठ तंत्र (formlist techniques) यांतील मार्क्सवादी विचारवंतानी उभारलेला कृतक विरोध बाजूला सारून रूपनिष्ठ तंत्र आणि सौंदर्यवादी कलेची स्वायत्तता ह्यासुद्धा ऐतिहासिक घटना आहेत अशी वेगळ्या अर्थाने उत्तरं आधुनिक वाटावीत अशी मांडणी इगलटन करतो. इथूनच इगलटन बेकेटच्या लेखनाचं वेगळं विश्लेषण करतो. बेकेटची लेखनशैली अल्पाक्षरी का आहे आणि त्याचा जगाकडे बघायचा दृष्टिकोण काय आहे याची चर्चा करताना 'politics of weakness' ही संकल्पना तो वापरतो. बेकेटने सातत्याने शक्तीहीन आणि दुबळ्या लोकांचा कैवार घेतला असं इगलटन मानतो. याचा एक संदर्भ बेकेटनं जर्मनांनी फ्रान्सवर केलेल्या आक्रमणाचा सक्रिय विरोध करणं आणि त्यासाठी त्याला फ्रेंच सरकारने पुरस्कार देऊन सन्मानित करणं यांत शोधता येतो. पण फक्त तेवढ्यानेच काही बेकेट शक्तीहीन आणि दुबळ्या लोकांचा कैवारी ठरत नाही किंवा फॅसिस्टांचा विरोधक ठरत नाही. बेकेटचं लिखाण यासाठी महत्त्वाचं ठरतं. बेकेटने लिहिलेलं प्रत्येक वाक्य दुबळ्या आणि शक्तीहीन लोकांच्या क्षमतेवर दाखवलेला विश्वास व्यक्त करतं. त्याच्या लिखाणात नियती (destiny) आणि निश्चितता (certitude) या सामर्थ्यसंपन्न आणि राजकर्त्या लोकांना पोषक ठरणाऱ्या पारंपरिक मूल्यांना तिलांजली दिलेली आहे. बेकेटचा त्याच्या स्वत:च्या आयरिश भाषेत लेखन करण्याऐवजी फ्रेंच भाषेत लेखन करण्याचा निर्णयही बेकेटची दुबळ्या लोकांप्रती असलेली निष्ठा दाखवते असं इगलटनचं मत आहे. आता हे कसं काय? बेकेटला आयरिश भाषा जास्त स्टायलीश आणि दुबळेपणा लपवणारी वाटते; तर फ्रेंच भाषा दुबळेपणा व्यक्त करणारी आणि कमी स्टायलीश वाटते. म्हणून त्याने लिखाणासाठी फ्रेंच भाषा निवडली.

बेकेटचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोण आशावादी नाही, पण तो दिसतो तितका गडद निराशावादीही (lugubrious हा इगलटनचा शब्द) नाही. बेकेटच्या जगाकडे बघण्याच्या निराशावादी/व्यर्थतावादी दृष्टिकोणाची मूळं इगलटन हा आयरिश वैचारिकता आणि धर्मशास्त्रात शोधतो. आयरिश विचारवंतांसाठी

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर कुणाची तरी सोबती हवी असते; पण असे का घडते, की जेव्हा ती व्यक्ती हवी असते तेव्हाच ती आपल्याजवळ नसते ?

या जगात काहीही नसणं (शून्य) याच्याइतकं दुसरं काहीही खरं नाही (Nothing is quite real as nothing). यासाठी इगलटन आयरिश धर्मपंडित, तत्त्वज्ञ, लेखकांची साक्ष काढतो. हा जीवनविषयक/जगाविषयीचा आयरिश दृष्टिकोण बेकेटच्या लिखाणात उतरलेला आहे. इगलटन बेकेटच्या दृष्टिकोणाला दुसऱ्या शब्दांत 'value of the negative' म्हणतो. आयर्लंड हा सर्वार्थाने विरळ देश. त्यात ब्रिटनसारखी घटनांची रेलचेल आणि जीवनाचा सर्वग्रासी दृष्टिकोण विरळच. वसाहतवादी ब्रिटन काहीतरी असलेला, तर ब्रिटनची वसाहत असलेला आर्यलंड जवळपास काहीही नसलेला देश. हा आयरिश अभाव, रितेपणा आणि विरळता बेकेटच्या लिखाणात आढळते. यांतही पुन्हा आंतर्विरोध आहेच. आयरिश राष्ट्रवाद, आयरिश धर्मविचार या सगळ्यांना बेकेटचा स्पष्ट आणि ठाम विरोध होता. बेकेट प्रॉटेस्टंट कुटुंबात जन्मलेला आणि त्याची सुरुवातीची वाढ वेस्ट ब्रिटिश वातावरणात झालेली. पण नंतर त्याने या सगळ्याच धारणांचा त्याग केला. बेकेट पक्का आधुनिक विचारांचा आणि निरिश्वरवादी. त्याचा आयर्लंडमध्ये निभाव लागणं शक्य नव्हतं म्हणून त्यानं पॅरिसला कायमचं स्थलांतर केलं. हे म्हणजे बंदिस्त आयरिश विचारांचा काच सोडून युरोपातील मुक्त, विशाल दृष्टिकोणाचा अंगीकार करणं होतं. बंधनं लादणाऱ्या आणि संकुचित आयरिश विचारव्युव्हामुळे बेकेटला पॅरिसच्या प्रयोगशील, मूलगामी आणि अपारंपरिक वातावरणात जावं लागलं. पॅरिसमध्ये राहूनही बेकेटमधील आयरिश विरळपणा, शून्यत्वाची जाणीव सुटली नाही. मग तो शून्यत्वाच्या जाणिवेला अधिकाधिक तोलुनमापून, गणितीय पद्धतीने व्यक्त करत राहिला. फ्रेंचांची मुक्त आणि अपारंपरिक विचारपद्धती आणि आयरिश रितेपणा आणि शून्यत्व यांचा संगम त्याच्या लिखाणात होत राहिला. त्यातूनच त्याची अल्पाक्षरी शैली आणि व्यर्थतावादी दृष्टिकोण घडत राहिले. त्याचं लिखाण उत्तरोत्तर अधिक प्रयोगशील होत राहिलं; इतकं की त्याच्या लिखाणाला नाटक कसं म्हणायचं असा प्रश्न पडावा! संवाद, दृश्यं, कथानक, घटना, पात्रं याशिवाय नाटक असू शकतं? बेकेटचं उत्तर 'हो' असंच आहे. त्याचं Breath नावाचं सर्वात छोटं नाटक (एक मिनिटापेक्षाही कमी कालावधी असलेलं) हे अशा अल्पाक्षरी, अल्पावधी आणि अपारंपरिक नाट्यकृतीचं प्रसिद्ध उदाहरण आहे.

इगलटन मांडतो तोच धागा पकडून कॅसानोव्हा तिच्या पुस्तकात बेकेटच्या लिखाणाचं अतिशय मूलगामी चिंतन मांडते. मला वाटतं बेकेटकडे बघायचा एक संपूर्णपणे नवा दृष्टिकोण इगलटन आपल्याला देतो. बेकेटला समजून घेताना इतिहास, समाज वास्तव आणि कलेची स्वायत्तता असं बहुपेडी विश्लेषण इगलटन आपल्यापुढे ठेवतो.

इगलटनच्या इंग्रजीचा उल्लेख मी सुरुवातीला केला होता. वानगीदाखल एक छोटा परिच्छेद मी इथं देतोय. इंग्रजी किती रसाळ, अर्थवाही, सुंदर आणि उन्मेषशाली असू शकते त्याचा प्रत्यय तुम्हाला येईल.

This is a Beckett who pursues the lgic of abstraction to its most inhuman extremes; who refuses the morphine of idealism even when in severe pain; whose work represents a merciless onslaught on the pretentions of Literature; and who preserves a compact with silence, breakdown and failure in the face of historical triumphalism and the self-flaunting word.

बेकेटसंबंधी असंच काहीसं...पुन्हा केव्हातरी...

**– प्रा. डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य महाविद्यालय,
नारायणगांव, जिल्हा पुणे
भ्रमणध्वनी – ९५२७३७९२७७

# अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक पद्धत
(भाग १)

*अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीय पद्धतीवर काही तथ्य व विचार या लेखात मांडण्यात आले आहेत - संपादक*

आजच्या घडीला प्रत्येक देश जागतिक पटलावर आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मग तो विशाल भूप्रदेश असलेला रशिया असो वा लहानसा सिंगापूर असो, एकपक्षीय चीन असो वा बहुपक्षीय भारत. परंतु हे निर्माण स्थान निर्माण करण्यासाठी प्रत्येक देशाला एक भूमिका नेहमीच निभवावी लागते ती म्हणजे अमेरिकेसोबतचे संबंध. मग ते राजकीय असो वा आर्थिक, चांगले असो वा वाईट. पण अमेरिकेला वगळून जागतिक स्थान मिळवणे अजून तरी शक्य नाही.

असे काय आहे या अमेरिकेत? तर २४० हून अधिक वर्षांचे स्वातंत्र्य, राजकीयदृष्ट्या प्रबळ, सामाजिकदृष्ट्या उंचावलेला, आर्थिकदृष्ट्या विकसित आणि लष्करी दृष्ट्या सज्ज!

या सदरात अमेरिकेच्या राजकीय व त्यात प्रामुख्याने अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीय पद्धतीवर दोन भागांत काही तथ्य आणि विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे

मानवाच्या राजकीय जीवनशैलीत एखाद्या गोष्टीचे निरीक्षण करताना माणूस हा सगळ्यात प्रथम त्या गोष्टीची आपल्याकडील गोष्टीशी तुलना करतो. अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीय पद्धत समजून घेण्यासाठी आपणही त्याची तुलना भारतीय निवडणूक पद्धतीशी करू या.

अमेरिका हा भारतीय भूप्रदेशाच्या तिप्पट आणि भारतीय लोकसंख्येच्या एक तृतीयांश जरी असला तरी, एका वैशिष्ट्यासाठी दोन्ही देश काही प्रमाणात सम पातळीवर आहेत, ती म्हणजे लोकशाही. भारतात ज्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाला आपले जीवन जगण्याचा, विचार मांडण्याचा, न्याय मागण्याचा, मतदान करण्याचा मूलभूत हक्क आहे, त्याचप्रमाणे अमेरिकन लोकशाहीने सुद्धा या प्रमुख हक्कांचा स्वीकार केलेला आहे.

तरीसुद्धा अमेरिकन लोकशाही ही भारतीय लोकशाही पेक्षा वेगळी ठरते. कारण, भारतीय लोकशाही पद्धतीने संसदीय प्रणाली; तर अमेरिकन लोकशाहीने अध्यक्षीय प्रणालीचा स्वीकार केला आहे. याचाच अर्थ, अमेरिकेत एक व्यक्ती संपूर्ण देशाची भूमिका राजकीय दृष्ट्या ठरवू वा बदलू शकते, परंतु भारतात मात्र संसद, बहुमताने आपली राजकीय भूमिका ठरवते. तसेच, भारतात सामान्य जनता प्रत्यक्ष निवडणुकीय मतदानाने संसदीय सदस्याची (खासदार) निवड करते. परंतु अमेरिकेत सामान्य जनता अप्रत्यक्ष निवडणुकीय मतदानाने आपल्या अध्यक्षाची निवडणूक करते.

भारतात राजकीय सत्ता ही राष्ट्रपतींच्या नावाने पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ चालवत असतात, तर अमेरिकेत राजकीय सत्ता ही राष्ट्रपती आपल्या नावाने व अधिकाराने स्वतः चालवत असतात. म्हणजेच अमेरिकन लोकशाही पद्धतीत पंतप्रधान हे पद अस्तित्वात नसते. तर भारतीय लोकशाही पद्धतीत राष्ट्रपतींपेक्षा खरे अधिकार पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ यांच्याकडे असते.

(पृष्ठ क्र. २१ वर)

# किल्ले बल्लारपूर

*विदर्भातील पुरातन शहर बल्लारपूर येथील 'किल्ले बल्लारपूर'चे वर्णन या लेखात केले आहे - संपादक*

बल्हारशाह वा बल्लारपूर अशी दोन नावे सहजतेने अंगाखांद्यावर मिरवत जगणारं विदर्भातील पुरातन शहर. इ.स. १४९७ पर्यंत चांदा (चंद्रपूर) प्रांतातील गोंड राजांच्या राजधानीचे ठिकाण. खांडक्या बल्लारशाह (इ.स.१४७२ ते १४९७) हा बल्लारपूरचा शेवटचा अधिपती. त्याच्या आधी सुमारे दहा पिढ्यांनी इथे राज्य केले. मोगल बादशहा अकबराच्या 'आई-ने-अकबरी' त खांडक्या बल्लारशाहचा उल्लेख 'बाबाजी बल्लालशाह' म्हणून आलेला आहे. अकबराला दक्षिणेकडील या लहान राज्याच्या राजाची दखल घ्यावीशी वाटली यातच खांडक्या बल्लारशाहचे महत्त्व अधोरेखीत होते. तो एक चतूर राजकारणी, मुत्सद्दी, पराक्रमी वीर, ईश्वरभक्त, स्थापत्यविद्, दूरदृष्टी असलेला प्रजाहितदक्ष राजा होता. अशा या थोर बल्लारशाह बाबाच्या राजधानीच्या गावी असलेल्या किल्ल्याला भेट देऊ या.

एका बाजूने विविध प्रकारच्या झाडांनी नटलेलं हिरवेगार जंगल आणि दुसरीकडे सुपीक-सपाट जमीन. या दोहोंतून संथपणे वाहणारी वरदा माय. या स्थानी वरदा अगदी स्थिर झालेली वाटते. या नदीच्या पूर्व तिरावर उभा आहे बल्लारपूरचा टूमदार किल्ला. साधारणपणे दोन क्रिकेटची मैदाने मावू शकतील एवढा याचा विस्तार. बल्लारपूरच्या रेल्वेस्टेशन वा बसस्थानकापासून अंदाजे १.५ कि.मी. अंतरावर. एकमेकांना काटकोनात असलेली तीन भव्य प्रवेशद्वारे ओलांडली की भव्य पटांगण दृष्टीपथास येते. या पटांगणाला चहुबाजूने भव्य तटबंदी आणि बुरूज तटबंदीच्या आत खोल राणीविहीर, राजवाडा, बारादरी, अश्वशाळा, गुप्त शस्त्रागार, परकोटावरून सहज भ्रमण करण्यासाठी दगडी पायऱ्या व रुंद रस्ते. सगळं काही एकदम टीपटॉप.



किल्ल्याच्या उत्तरेकडील प्रवेशद्वारातून बाहेर पडलो की लागलीच उतार येतो. थोडे चालून गेलो तर परत चढण सुरू होते. हा खोलगट भाग म्हणजे वरदा नदीचा जुना प्रवाह. इथून डाव्या बाजूला वळलो की नदीला आपण सहजतेने गुडघाभर पाण्यातून ओलांडू शकतो आणि पलीकडील कोलगावला पोहोचतो. पुढे एक वाट शिरपूर (वणी, जि. यवतमाळ) कडे तर दुसरी धोपटन नाला. भडांगी, सास्ती, गौरी, कडोली, मानोली, पांढरपवनी, गडचांदूरजवळून माणिकगढ या दुर्गम किल्ल्याकडे जाते. मात्र उत्तर दरवाजातून नाकाच्या शेंड्याकडे नजर ठेवून सरळ रेषेत उत्तरेकडे गेलो की कबरस्थान, जाणबाची वाडी, विसापूर (गोंड), भूईकुंडचा स्वच्छ पाण्याचा बारमाही ओघळ, पोड्यांचं नांदगाव, बाबुपेठ, लालपेठ होत सुप्रसिद्ध महाकाली मंदिरापाशी

नातं आणि विश्वास हे एकमेकांचे खूप चांगले मित्र आहेत. नातं ठेवा अगर ठेवू नका, विश्वास मात्र जरूर ठेवा. कारण जिथं विश्वास असतो तिथं नातं आपोआप बनत जातं.

आपण सरळ चंद्रपूरच्या वेशीवर पोहोचतो. हा त्याकाळचा राजमार्ग आजही सुस्थितीत आहे. थोडक्यात बल्लारपूरचा किल्ला अशाप्रकारे गोंडकालीन महत्त्वाच्या ठाण्यांशी जुळलेला होता. या मार्गावर आपणास नांदगाव नजीक पुरातन लेण्यांचेही दर्शन होते.

किल्ल्याला खेटून वाहणारी अंदाजे ३०० मीटर रुंदीची नदी पूर्वेच्या बाजूने नैसर्गिक खंदकाचे काम करते. वरच्या अंगास अंदाजे तीन कि. मी. अंतरावर वरदा व ईरइ नद्यांचा संगम; तर त्यापुढे १२ कि. मी. अंतरावर वढा इथे वरदा आणि पैनगंगेचा संगम. अशाप्रकारे वरदा नदीला आपसुकच भरपूर पाणी. ही दक्षिणवाहिनी नदी किल्ल्यानजीक एकदम ९०° त वळती होत पूर्व-पश्चिम वाहिनी होते. पुढे पाच कि. मी. अंतरावर असलेल्या रामतिर्थाजवळ परत ९०° त वळण घेऊन दक्षिणवाहिनी होते. या वरदेच्या किल्ल्यालगतचा किनारा एकावर एक रचलेल्या खडकाळ दगडांचा, तर पलीकडचा काठ थोड्याफार वनराईचा. ही नदी पुढे दहा कि. मी. पर्यंत खतरनाक डोहयुक्त, तलावातील संथ पाण्यासारखी. खोली अंदाजे तीस ते पन्नास फुटापर्यंत. अनेक पट्टीच्या पोहणाऱ्यांनाही या नदीचा थांग लागलेला नाही. एकदा उडी मारली आणि पोहणारा वर आलाच तर डोक्याला खडक लागलाच म्हणून समजा. त्यामुळे त्याला नाहक जीव गमवावा लागतो. अशा या स्थिर पाण्यात जलचरांचा भलताच उपद्रव. मगरी, मोठ्ठाले मासे आणि तोंडाला पाणी सोडणारे ताजे झिंगे अशी या नदीची खासियत. त्यामुळे खवय्यांसाठी ही वरदामय वरदानच की! काही असो, त्यामुळे बारादरीनजीकचा हा भाग निर्धोक झालेला आहे.

बारादरीवरून खाली तटाकडे बघितल्यास ठरावीक अंतरावर धातूच्या गोल कड्या ठोकून बसविल्याचे दिसते. पावसाळ्यात पुराचे पाणी जसजसे वर चढते, तसतसे कोणत्या नंबरची कडी बुडालेली आहे, त्यानुसार पाणी कुणाच्या घरापर्यंत पोहोचले आहे, ते समजते. थोडक्यात, त्या पुरातन काळीही गोंड लोकांचे सर्वेक्षण किती अचूक होते ते उमगते आणि भावते ती त्यांची दूरदृष्टी.

ज्या टेकाडावर हा किल्ला उभा आहे, तो सुमारे १५-२० फूट उंचीचा आहे. पण एवढी उंची शहराचे रक्षण करण्यास समर्थ आहे. आजतागायत अनेक महापूर शहराने बघितलेत. पण या किल्ल्यामुळेच शहर आजही अभेद्य आहे. असा आहे हा ढाण्या वाघ.



बारादरीच्या उजव्या अंगाने एक वाट थेट नदीत उतरते. तिथे हत्ती, घोड्यांना आंघोळ घालणे, त्यांची क्रीडा, मौजमस्ती आणि पिण्याच्या पाण्याची आपसुकच सोय व्हायची. दुसरी वाट डाव्या बाजूने बाया-बापड्यांसाठी नदीत उतरण्यासाठी. मुख्यद्वारातून या वाटेकडे बघितले तर डोळे मचकन् बंद करावे लागतात. कारण नदीचे चकाकणारे पाणी त्यांना असह्य होते. सद्या नदीकिनारी पालिकेने लहानसा बगीचा तयार करून सौंदर्यवर्धन करण्याचा प्रयत्न केला आहे.

रामतीर्थावरील लेण्या नदीच्या प्रवाहामुळे तयार झाल्याचे दिसते. आतील उबडखाबड मूर्त्यांना नंतर

कुण्या कलाकाराने राम, लक्ष्मण, सिता व हनुमानाच्या मूर्त्यांमध्ये रूपांतरीत करण्याचा प्रयत्न केल्याचेही जाणवते. सास्ती कॉलरी आणि खडांगीचे ग्रामस्थ ह्या ठिकाणी स्वखर्चाने ही जागा साफ करून रामनवमीचा उत्सव मोठ्या धुमधडाक्याने साजरा करतात.

किल्ल्याच्या तटापर्यंत शहर खेटले असले तरी पहिले द्वार ओलांडताच या परिसरातील आदिमपण जाणवू लागतं. शुद्ध वारा पोटांत जाताच राग, लोभ, द्वेष, चिंता, वैताग, नैराश्य, कटकटी, नातीगोती आपण विसरतो. इथे वितराग सुरू होतो. आपण आपल्याशीच स्वगत करू शकतो, इतकी निरव शांतता लाभते. अशा शांत समयी मावळतीचा सूर्य बघावा तो इथल्या बारादरीवरूनच. अस्ताच्या पंधरा-वीस मिनिटं आधी सूर्यदेवाची रंगपंचमी सुरू होते. तांबडा, नारंगी, पिवळा, निळा, हिरवा, जांभळा अशा सर्व रंगाची उधळण सूर्य त्याच्या सात घोड्यांच्या टापांद्वारे आकाशाच्या विस्तीर्ण पटलावर उधळतो आहे की काय असा भास होतो आणि करून देतो आपल्या देवत्वाची जाणीव. आकाशात उधळलेल्या या रंगपंचमीची बरसात आपण त्याचवेळी नदीच्या स्फटीक समान पाण्यातही बघू शकतो. अशा कातरवेळी आठवतो तो 'आनंद'चा राजेश खन्ना आणि त्याचं गाणं 'कहीं दूर जब दिन ढल जाए ...!' सूर्यास्ताच्या वेळेचा क्षणोक्षणी बदलणारा इस्टमन कलर नजारा डोळ्यांत साठविण्यासाठी एकदातरी बल्लारपूरच्या या किल्ल्याला भेट द्याच.

ही रंग उधळण संपत असता दिवा विझतांना वात जशी एकवार प्रखरतेने जळते आणि नंतर विझते, तसाच सूर्यही मावळण्याआधी एकवार तेजस्वी सोनेरी किरणांची बेफाम फेक करतो आणि संपूर्ण परिसर सुवर्णमय करून टाकतो. वरदेचे पाणीही यावेळी सुवर्णी होते. अगदी सोनाराच्या तप्त मुशीतून निघणाऱ्या सुवर्णी पाकासारखा! लगेच अंधारायला होतं. यावेळी सूर्य पिवळा, तांबडा, लाल, जास्वंदी लाल, लाल भडक असा द्रुतगतीने रंग बदलतो. त्यानंतर काजळी जमल्यागत हळुवारपणे काळसर लाल होत जातो. अस्ताचलाच्या आधी थोडाफार प्रकाश असला तरी समोरचे कोलगाव मात्र काळोखात अदृश्य झाल्याचे स्पष्ट दिसते.

अशा अस्ताचलाच्या काळोख्यात किल्ला आळोखेपिळोखे देत जागा होतो. लगतच असलेल्या जुन्या चिंचेच्या वृक्षावर दिवसभर उलटच्या दिशेने लोंबकळत असलेली ४००-५०० वटवाघुळे थव्या-थव्याने उडत जणू सांगत असतात, ''आम्ही इथले शिपाईगडी. 'दिन तुम्हारा रात हमारी' असे बजावत, खडा पहारा द्यायचाय आम्हाला'' अशा थाटात सारखे इकडून-तिकडे आणि तिकडून-इकडे वेगाने घिरट्या घालतात. अशावेळी या प्राण्यांना घाबरायचे कारण नाही. एकदा ओळख पटली की ते दुरूनच तुम्हाला न्याहाळतील आणि आपल्या कामांत गर्क होतील. यानंतर नंबर येतो तो काजव्यांचा. कुठून तरी प्रकाशझोत यावा अशाप्रकारे ते उगवतात. अवती-भवती गिरक्या घेत त्यातला एखादा अलगद तुमच्या हातावर विसावेल. लाडाने तुम्ही मुठीत धरले की ते कोमेजतील आणि मूठ उघडली की लगेच प्रकाशमान होतील. त्यांचं वागणं अगदी लहान बाळासारखं. पकडलं तर हिरमुसणं आणि सोडलं तर अवखळणं. आता हळूहळू टिमटिमणाऱ्या प्रकाशाला सोबतीनं घेत चांदण्या लाजत-मुरडत येतात. काही मात्र निलाजऱ्याच. ढालगज भवान्याच जणू! अशावेळी वाटतं काळ्या आभाळाने संक्रातीची खडीची साडी चोपून नेसलेली आहे. नेमके त्याचवेळी आकाशाचे प्रतिबिंब वरदेच्या पाण्यात उमटते. बिंब आणि प्रतिबिंबाचा हा स्थिरावलेला क्षण मोठाच मनमोहक असतो. अशातच माश्यांच्या उसळीणे पाणी कारंज्याप्रमाणे वर उडते आणि वाटतं राजकुमारी आंघोळ आटोपून ओलेत्याने केसं सावरीत येत आहे.

---

तुम्ही एक वेळ पैसा गमावला तरी चालेल; पण वेळ कधीही गमावू नका कारण वेळेचा उपयोग करणाऱ्या माणसाच्या पायाशी धन, कीर्ती आणि वैभव हे चालत येते.

वातावरण असं मदहोश असता आपण त्याच्याशी तद्रूप होत जातो आणि त्या तंद्रीतच पोहोचतो त्या प्राचीन कालौघात. तेंव्हा तुम्हाला उत्तरेकडील द्वारातून येणाऱ्या-जाणाऱ्यांचा राबता, घोड्यांचे खिंकाळणे, मदमस्त हत्तींचा हलत-डुलत चालतांना होणारा रेतीं-खड्यांतून निघणारा रपरप आवाज ऐकू येईल आणि ऐकू येईल तो पेटत्या मशालींच्या सोबतीने 'होशियाऽऽर' असा पहारेकऱ्यांचा व राणीविहिरीतून रहाटाद्वारे पाणी काढतांना हसण्या-खिदळणाऱ्या ललनांचा. यावेळी किल्ला तरोताजा होत असल्याचे जाणवेल आणि जाणवेल तो ढोलकीच्या तालावर ठेका घेत एकमेकांचे हात गुंफून गोंडी भाषेतील गीत गात पायांची लयबद्ध हालचाल व डोईला पक्ष्यांची रंगबिरंगी पिसे खोचलेल्या मुली, तर मुंडाश्याला रानगव्याची शिंगे बांधलेला म्होरक्या व त्याच्या सवंगड्यांनी केलेला बेफाम नृत्याविष्कार. अगदी 'झिंगा ललाम' सारखा. किल्ल्याचा संपूर्ण परिसर या नृत्याकडे कुतूहलाने बघतांना दिसेल. हा 'झिंगाट' शुक्रताऱ्याच्या उगवतीपर्यंत सुरू असतो आणि त्यानंतर हळूहळू कमी होत तांबडं फुटायच्या कितीतरी आधी विसावतो, अगदी एखाद्या 'शापितासारखा'. आपण तंद्रीतून जागे होतो. उदास वाटत असले तरी मानवी जीवनाच्या सुरू झालेल्या रहाटीत आपसूकच ओढले जातो. फक्त रात्रीची 'मेहेफिल' आठवणीत ठेवूनच...!

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
भ्रमणध्वनी : ९७६६०२३४१५/७७५८०२५३३४

•••

(पृष्ठ क्र. १७ वरून - **अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक पद्धत**)

यावरून भारतात पंतप्रधान आणि अमेरिकेत अध्यक्ष हे राजकीय अधिकारदृष्ट्या एकाच पातळीवर वाटत असले तरी अनेक कारणांनी अमेरिकन अध्यक्ष हा राजकीय अधिकारदृष्ट्या अधिक बलशाली ठरतो. यातील प्रमुख कारण म्हणजे, भारतीय पंतप्रधानांचे पद हे संसदेत बहुमत असेपर्यंतच टिकते. यामुळे अनेक भारतीय पंतप्रधानांना आपला ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही. यातील प्रमुख उदाहरण म्हणजे १९९६ साली अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार बहुमताअभावी १३ दिवसात, तर १९९९ साली एका मताअभावी १३ महिन्यात कोसळले. परंतु, अमेरिकन अध्यक्षास आपले सरकार संपूर्ण ४ वर्षे चालवण्याची मुभा संविधानिकदृष्ट्या देण्यात आली आहे.

तसेच, भारतीय पंतप्रधान हा संसदेचा सदस्य असल्याने, आपले मंत्रिमंडळ त्यांना संसदीय सदस्यातूनच निवडावे लागते. तर अमेरिकन अध्यक्ष हा तेथील संसदेचा सभासद नसल्याने, त्यांस आपले मंत्रिमंडळ संसदीय सदस्यातून निवडण्याची अट लागू होत नाही.

या सर्व तथ्यांमधून आपणास अमेरिकन अध्यक्षाच्या पद आणि अधिकाराचा अंदाज आला असेल. याचा पुढील भाग हा अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक पद्धतीवर आधारित असेल.

**- प्रा. सुनिल नागरे**
इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग
व्ही पी एम तंत्रनिकेतन,
ठाणे

•••

समजावण्यापेक्षा समजून घेण्यामध्ये खरी परीक्षा असते, कारण समजावण्यासाठी अनुभवाचा कस लागतो, तर समजून घेण्यासाठी मनाचा मोठेपणा लागतो..!!!

# तलावाचे मनोगत

*करोना (कोवीड-१९) महामारीचा संसर्ग वाढू लागल्यामुळे ठाण्यातील कचराळी तलाव फिरण्यासाठी बंद केला होता. काही कालावधी नंतर तलाव फिरण्यासाठी पुन्हा सुरु करण्यात आल्यानंतर कचराळी तलावाने लेखकाकडे व्यक्त केलेले मनोगत या लेखात विशद केले आहे - संपादक*

मी ठाणे महानगरपालिकेच्या जवळ असलेल्या तलावासमोर राहतो. गेली काही वर्षे रोज सकाळी साडे-पाच वाजल्यापासून ते साडे-सहा वाजेपर्यंत तलावाच्या चारही बाजूने बांधलेल्या मार्गिकेवर (Jogging Track) फेऱ्या मारतो.

परवा सकाळी बरोबर साडे-पाच वाजता मी चालायला जाण्यासाठी म्हणून खाली उतरलो आणि तलावाभोवती फेऱ्या मारायला सुरुवात करणार इतक्यात मागून आवाज आला आणि कोणीतरी हाक मारत आहे असे मला वाटले म्हणून मागे वळून बघितले तर तेथे कोणीच नव्हते! कारण एवढ्या सकाळी तलावावर जेमतेम चार ते पाच जण फिरायला आलेले असतात. पुन्हा चालण्यास सुरुवात केली. परत थोड्या वेळाने तोच आवाज आला आणि मागे वळून बघितले तर कोणीच नव्हते. मला हा प्रकार नवीनच होता. करोना (कोवीड-१९) महामारीचा संसर्ग वाढू लागल्यामुळे गर्दी टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून सरकारने २२ मार्च २०२० पासून फिरण्यासाठी बंदी केली होती.

त्यानंतर आजच उद्यानाचे फाटक उघडलेले बघितल्यावर फेऱ्या मारण्यास सुरुवात केली तेव्हा हा प्रकार घडला. प्रथम थोडा चक्रावलो, थोडा घाबरलो सुद्धा. मनात म्हटले गेले कित्येक दिवस हा तलाव बंद आहे आणि पहिल्याच दिवशी हे काय चालू झाले? खरे पाहिले तर मी समोरच राहात असल्यामुळे सकाळी साडे-चार पाच वाजल्या पासून अगदी मोजकी दहा माणसे तेथे फिरावयास येतात. ते मला व मी त्यांना प्रत्यक्ष ओळखत नसलो तरी गेली अनेक वर्षे आम्ही एकमेकांना बघत असल्यामुळे त्यातीलच कोणी विशेष सलगी दाखवण्याचा प्रयत्न करतो आहे का असे मला वाटले. पण तसे काहीही नव्हते. एकाद दुसरा माणूस सुमारे ५० पावले पुढे होता व मागे तीस-चाळीस पावलांपर्यंत कोणीही दिसत नव्हते. मग हा आवाज कुठून येतो ते पाहण्यासाठी क्षणभर थांबलो. तर मागून आवाज आला, ''घाबरू नको. मी 'कचराळी तलाव' बोलतो आहे''. मी क्षणभर आश्चर्यचकित होऊन थबकलो. तो म्हणाला, ''तू चालत रहा, मला तुझ्याशी काही बोलायचे आहे''. मग मी थोडा सावरलो आणि चालण्यास सुरुवात केली. संवाद चालूच होता, मी ऐकत होतो. तो म्हणाला, ''अरे बाबा, तुम्हाला सगळ्यांना पाहून मला आज किती आनंद झाला हे शब्दात सांगण्या पलीकडचे आहे. तरीही मी माझ्या भावना सांगण्याचा प्रयत्न करून पाहतो.'' मी मनातल्या मनात म्हटले की, मला तलावापाशी हितगुज करण्याची इच्छा आहे हे याला कसे समजले? तलावाने बहुतेक ते ओळखले आणि म्हणाला, ''बरोबर ओळखलेस, अरे तुझ्या मनातले मी कित्येक दिवस जाणून आहे. करोनामुळे बाहेर पडण्यास बंदी केल्यामुळे तू बाहेरच पडत नव्हतास. पण समोरच रहात असल्यामुळे रोज सकाळी घरातील गॅलरीमध्ये फेऱ्या मारताना मी तुला पहात होतो आणि नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून तू घरासमोरील रस्त्यावर फेऱ्या मारायला सुरुवात केली हे देखील मला माहीत आहे.'' गेल्या आठ दिवसांपासून मंदिरामध्ये जाण्यासाठी सरकारने परवानगी दिली आणि

त्यामुळे तलावाच्या बाजूला असलेल्या मंदिराच्या निमित्ताने मला तेथे जावयास मिळणार याचा आनंद झाला होता. पण माझ्या लक्षात येत नव्हते की, माझ्या मनातील या सर्व गोष्टी तलावाला कशा काय समजल्या? त्यावर तो म्हणाला, ''अरे मला देखील तितकाच आनंद झाला आहे, म्हणून हे सांगण्यासाठी तुला हाका मारत होतो. आता आलं का लक्षात?'' तो पुढे म्हणाला, ''तू ज्या नजरेने रोज सकाळी फेऱ्या मारून झाल्यावर माझ्याकडे बघत होतास तेव्हाच मी जाणले की, तुला माझ्याबरोबर संवाद करण्याची इच्छा आहे. खरं सांगू? मला देखील कोणाशी तरी बोलावे असे वाटतच होते. पण कोणाशी बोलावे बरे, असा विचार करत असताना तू सुद्धा याकरता उत्सुक आहे हे मी जाणले.''

मी नकळतच त्याला म्हटले की, ''माझ्याशी बोलावे असे तुला का बरे वाटले? तुझ्याजवळ मला सांगण्यासारखे असे काय आहे?'' त्यावर तो म्हणाला की, ''बरोबर आहे तुझे म्हणणे, तलावाचे कसले आले आहे मनोगत? पण आम्ही सर्व तलाव जमिनीखालून एकमेकांशी जोडलेले आहोत आणि आम्ही नेहमीच एकमेकांशी हितगुज करीत असतो. तुझा जन्म मासुंदा तलावासमोरील परीसरात झाला व तुझ्या घरासमोरच मी असल्यामुळे, ज्याला तलावाचे पाणी दिसते त्या प्रत्येकाला मी पाहात असतो, हे ठाऊक आहे का तुला?'' त्यावर मी नकारार्थी मान हलवून 'नाही' असे उत्तर दिले.

मग ऐक; ''तलावाचे पाणी पाहणाऱ्याला तलावही त्याच्याकडे पहात असतो. पर्यायाने जलदेवता म्हण किंवा तसंच समज. त्याचप्रमाणे सकाळी सूर्य उगवताना नंतर पाण्यात तिरके पडणारे प्रकाशकिरण परावर्तित होऊन तुझ्या घरामध्ये भिंतीवर आणि छतावर पडतात. त्या किरणांमधूनही आम्ही सर्व काही पहात असतो किंवा आम्हाला ते दिसत असते. तुझ्या घरातील हॉलमध्ये आणि बेडरूममध्ये भिंतीवर पडणाऱ्या अशा परावर्तित सूर्यकिरणांचे फोटो काढून तू व्हॉट्स अप वर टाकले होते हेही मला माहीत आहे. बरं ते जाऊदे, तुझ्याशी अनेक गोष्टी बोलायच्या आहेत. शेवटी मानवाप्रमाणेच मी देखील निसर्गाचा एक भाग आहे रे. तुम्ही आत्ता तीस-पस्तीस वर्षांपूर्वी कॉम्प्युटरचा शोध लावला आणि वापर सुरू केला. आमचा कॉम्प्युटर अनादिकालापासून कार्यरत आहे आणि त्याची मेमरी ही इतकी आहे की, मानवाने कितीही प्रयत्न केला तरी त्याची गणतीही करता येणार नाही किंवा जाणूनही घेता येणार नाही. तुम्हा सर्वांनाच वय आहे, पण निसर्गाला वय नाही.'' मी मनात म्हटले, 'अरे खरंच मला या गोष्टीची काहीच कल्पना नाही किंवा या दृष्टीकोनातून मी कधी विचारच केला नव्हता.' त्यावर या गोष्टीची प्रचीती येण्यासाठी त्याने मला एक गोष्ट सांगितली.

''सुरुवातीला तुम्ही इथे सन १९८९ मध्ये माझ्यासमोर राहायला आल्यापासून गणपती विसर्जन माझ्याच पाण्यात करीत होतात. तू दोन-तीन वेळा येथे पोहायला आला होतास.'' मी होकारार्थी मान हलवली. ''मी तुझ्या घरापासून जेमतेम पंचवीस फुटांवर होतो आता ५० फूटांवर गेलो. या तलावामध्ये तीन ते चार मृत्यूही झालेले आहेत. तसेच तलावाच्या समोरच्या बाजूला झाडाला गळफास लावून घेऊन एकाने आत्महत्या केली होती.'' त्यावर मी म्हटले, ''हे सर्व खरे आहे. पण या सर्वांचा मला हाक मारण्याशी काय संबंध?'' ''अरे मानवाला जसे निसर्गरम्य ठिकाणी जावयास आवडते आणि निसर्गाशी हितगुज करायला आवडते तसे कोणीतरी येथे आला आणि माझ्याजवळ व आजूबाजूच्या निसर्गाजवळ मनापासून एकरूप झाला की आम्हालाही आनंद होतो. खरं सांगू! आज मला खूप आनंद झाला आहे. माझ्याभोवती असलेल्या मार्गिकेवर आपण सर्वजण रोजच पूर्वीप्रमाणे येत जा.

नाते कितीही वाईट असले तरी ते कधीही तोडू नका, कारण पाणी कितीही घाण असले तरी ते तहान नाही, पण आग विझवू शकते!

तुम्हा सर्वांचे स्वागत आहे. अरे जुन्या ठाण्यामध्ये, आत्ता असलेल्या तलावांपेक्षा दुप्पट तलाव होते आणि त्यांचे आकारमान आत्ता असलेल्या आकारमानापेक्षा दुप्पट होते. तुम्ही शहर मोठे व्हावे, रस्ते मोठे व्हावे म्हणून आमची गळचेपी केलीत आणि नगरसेवकांनी मतांची संख्या वाढविण्यासाठी आमच्या आसपासच्या परिसरात झोपड्या बांधून आमचा गळाच दाबला या गोष्टीचे फार वाईट वाटते. गेल्या काही वर्षांपासून बरोबर सकाळी सहा वाजता ध्वनिक्षेपकावरून लागणारी सुंदर मराठी गाणी, रविवारचे कट्ट्याचे कार्यक्रम, इथे रोज सकाळी भरणारा हास्यक्लब, सायंकाळी होणारी लहान मुलाबाळांची गर्दी, त्याचबरोबर महानगरपालिकेने बसविलेल्या व्यायाम करण्याच्या साहित्यांवर व्यायाम करणारे तरुण-तरुणी हे सगळे मी रोज अनुभवत होतो. या सगळ्यांतून मिळणाऱ्या सुखाला गेले सात-आठ महिने पारखा झालो होतो रे! पण आता येथे ही अशी गर्दी आणि वर्दळ पुन्हा चालू होणार हे बघून मला आनंद होत आहे. वाईट एकाच गोष्टीचे वाटते की, माझ्यासभोवताली लावलेल्या सुंदर फुलझाडांची फुले आणि कळ्यासुद्धा ओरबाडून देवपूजेकरता नेल्या जातात आणि निर्माल्याचा कचरा माझ्याभोवती टाकून येथे घाण करतात. जसे तुमचे घर स्वच्छ रहावे असे तुम्हाला वाटते तसेच माझ्याभोवतीचा परिसर स्वच्छ रहावा असे मलाही वाटते.''

तलावाचे अविरत कथन पुढे चालूच होते. ''अरे तुम्ही करत असलेल्या वापरामुळेच निसर्गही पुन्हा-पुन्हा बहरून येत असतो, वाढत असतो; पण त्याचा दुरूपयोग किंवा अतिरेक करू नका.'' मला पाचवी किंवा सहावी मध्ये पाठ केलेली वामन पंडित यांच्या वेचे या काव्यप्रकारातील कविता आठवली, 'की तोडीला तरू फुटे आणखी भराने'. म्हणजे वाढ होण्यासाठी वृक्षालाही तोडावे लागते. त्यावेळी तो बहरून येतो, नवीन पालवी येते, फुले फळे येतात. त्या सर्वांचा आपण लाभ घेत असतो. ''पण कळ्यांसकट फुले तोडून नेणे यावर बंदी घातली पाहिजे, माघी गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी तलावाभोवती काही हजार मंडळी प्रसादासाठी येत असतात व प्रसाद घेऊन जातात. पण गेली काही वर्षे कार्यक्रमानंतर स्वच्छताही योग्य प्रकारे करतात त्याचाही मला आनंदच आहे.''

मी इतकी वर्षे रोज सकाळी येथे येत आहे, पण माझ्याही लक्षात न आलेल्या अनेक गोष्टी त्याने अगदी बरोबर सांगितल्या. तो पुढे म्हणाला, ''तू पाण्यात फिरणारी बदके पाहिली आहेसच.'' मी म्हणालो ''पूर्वी किमान पाच-सात बदके होती आता दोन-तीनच दिसतात. पण त्यात काय एवढं मोठं सांगायला पाहिजे?'' तो म्हणाला, ''वाः अरे मला येथे होणाऱ्या प्रत्येक गोष्टीचे किती अप्रूप आहे म्हणून सांगू, ती बदके मागची पिसे हलवत-हलवत इकडून-तिकडे मासे पहात फिरताना आणि त्यांच्या पावलांचा (नावाडी करतो त्याप्रमाणे होणारा) डबक-डबक असा आवाज ऐकून मला किती गुदगुल्या होतात म्हणून सांगू! लहान मुलांना किंवा नातवंडांना मांडीवर खेळवताना जसा तुम्हाला आनंद होतो तसाच या बदकांच्या या क्रीडेमुळे मला होतो. त्यांची पाण्यात डुबकी घेऊन मासे पकडण्यासाठी होणारी धडपड आणि त्यातून वाचण्यासाठी माशाने खोलवर जाण्यासाठी मारलेली मुसंडी ही अनुभवल्याशिवाय तुला कळणार नाही.'' तो इतका भावविवश होऊन बोलत होता ते ऐकतच रहावे असे मला वाटले. ''अरे बाबा त्या बदकांची अंडी देण्याच्या वेळची सुरक्षित जागा शोधण्यासाठी चाललेली धडपड, अंडी घातल्यानंतर त्यांच्या रक्षणासाठी त्यांची म्हणजे नर-मादीची होणारी तारांबळ या सगळ्या गोष्टी पाहतांना मला होणारा आनंद शब्दात सांगणे कठीणच आहे आणि हो! एक लक्षात ठेव, एक दोन दिवसातच तुला

या बदकांच्या पाठोपाठ दुडुदुडुधावणारी किंवा पोहणारी दोन बाळे बघायला मिळणार आहेत. ते दृश्य किती विलोभनीय असेल नाही का?'' मी नकळत मान डोलावली आणि ''नक्कीच बघायला आवडेल'' असे म्हणालो. तो पुढे बोलू लागला ''तुला माहीत आहे का, पावसाळा सुरू झाला की तुम्ही बसता तो 'भट कट्टा', (श्री. भट हे वयाने आणि उंचीनेही मोठे व्यक्तिमत्त्व असलेले गृहस्थ आहेत. गेली अनेक वर्षे तलावावर नेमक्या वेळेस फिरावयास येतात आणि कंपाउंडच्या छोट्या गेट समोर बरोब्बर ठरलेल्या एकाच जागेवर बसतात म्हणून त्यांना ओळखणाऱ्या सर्व मंडळींमध्ये त्या जागेला 'भट कट्टा' असे नाव पडले आहे.) त्या बाजूला तीन-चार जण हातात असलेल्या काठ्यांना गळ लावून मासेमारी करण्यासाठी येतात.'' मी ''हो बरोबर आहे'' असे म्हणालो. ''मी सुद्धा बरेच वेळा त्यांची, गळाला कणिक लावून पाण्यात टाकल्यानंतर प्रतीक्षा करण्याची चिकाटी बघून, 'केव्हा एकदा मासा गळाला लागेल' ते बघत बसतो. पण दोन-तीन वेळा कणिक किंवा ब्रेडचा तुकडा लावून गळ टाकल्यानंतर जेव्हा गळाला मासा लागतो त्यावेळेस त्याला होणारा आनंद आणि जरा तिरका हिसका काठीला देऊन ती काठी जेव्हा तो वर उचलतो तेव्हा त्या छोट्याशा माशाची पाण्यातून बाहेर पडताना होणारी धडपड आणि त्यावेळेस होणारा 'सरकन्' असा आवाज ऐकल्यावर जीव जाताना होणाऱ्या वेदना काय असतील हे जाणवते आणि अंगावर जणू काटा उभा राहिल्यासारखे वाटते रे.'' त्यावर तो म्हणाला ''हे अगदी खरे आहे, मलाही माझ्या अंगाखांद्यावर खेळलेला जीव त्या गळाला लागून जेव्हा धडपड करीत बाहेर पडतो तेव्हा गहिवरून येते. पण मी माशांना पाण्यात वाढवायचे आणि माणसांनी खाण्यासाठी त्याला पकडून, मारून खायचे हाच निसर्गनियम आहे त्याला काय करणार?'' (असे म्हणून त्याने सुस्कारा टाकल्याचा आवाज माझ्या कानी आला) थोडे थांबून आणि विषय बदलून तो पुढे म्हणाला, ''२०१४ साली लोकसभेच्या निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर श्री. पटेल नावाच्या गृहस्थांनी नेहमी येणाऱ्या लोकांना पेढे वाटले होते, बरोबर ना?'' मी नकळत 'हो' म्हणालो. कारण तसे म्हटल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. तो पेढा खाणाऱ्यातला मी एक होतो. तलाव पुढे म्हणाला, ''बाजूला असलेल्या गणपतीच्या देवळात सकाळची पहिली घंटा वाजल्यानंतर थोड्या वेळाने ध्वनिवर्धकावर लावली जाणारी सुमधूर भूपाळी, भक्ती गीते आणि आरत्या, मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे ठरलेल्या वेळेवर येणारी भट साहेब यांच्या ग्रुपमधील सर्व मंडळी, रोज न चुकता येणारे ठाण्याचे पहिले नगराध्यक्ष मराठे साहेब, अति भरभर चालणारे, तसेच काठी टेकत-टेकत हळूहळू चालणारे वृद्ध पुरुष आणि स्त्रिया, सायंकाळी होणारी लहान मुलांची दंगल, त्यानंतर प्रेमी तरुण-तरुणी यांच्या होणाऱ्या कानगोष्टी, कालच्या दिवसभरात काय घडले याचा साद्यंत वृत्तांत एकमेकींना सांगणाऱ्या गृहिणी, सायंकाळचेवेळी निवांतपणे गप्पा मारणारी (वेळ घालविण्यासाठी आलेली) वृद्ध मंडळी, नित्य नियमाने आणि मंगळवारी व चतुर्थीला गणेश दर्शनासाठी येणारी भक्त मंडळी, तरुण-तरुणींची टोळकी अशा सर्वांचे मी कायम स्वागतच करतो''.

एवढे बोलून तो थांबला, पण माझे विचार चक्र मात्र चालू राहिले व त्यातूनच हा लेख लिहिण्यास लेखणी सरसावली आणि आपणा सर्वांनाही यामध्ये सामील करून घ्यावे असे वाटले, म्हणून हा प्रपंच!

**- अुत्तम भास्कर जोशी**
'अुषाभास्कर',
जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, पांचपाखाडी,
'कचराळी' तलावासमोर, ठाणे-४००६०२.
मो.नं. ९८२११६४६१७
Email : ubj1234knsba@gmail.com

प्रत्येक गोष्ट आपल्या नशिबातच असते असं नसते; आपल्याकडे जे आहे त्यात आपण समाधानी कधीच नसतो.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला : विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कृती जोपासावी – ज्येष्ठ कवी, गीतकार पद्मश्री ना. धों. महानोर**

विद्या प्रसारक मंडळ संचलित जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे 'सव्वीसावे पुष्प' दिनांक १९ डिसेंबर २०२० रोजी ज्येष्ठ कवी, गीतकार व साहित्यिक पद्मश्री ना. धों. महानोर यांनी 'रानातल्या कविता : ना. धों. महानोरांचा काव्य प्रवास' या विषयावर गुंफले. ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेला नावारूपाला आणण्यासाठी काम केलेल्या स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही व्याख्यानमाला अविरत सुरू आहे. या व्याख्यानमालेत ज्येष्ठ संस्कृत पंडित प्रभाकर आपटे, तत्त्वज्ञ शुभदा जोशी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू दीपक टिळक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा मिश्रा, पद्मश्री भरत वाटवाणी, पद्मश्री सीड मदर राहीबाई पोपेरे, ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. वामन केंद्रे व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री डॉ. प्रकाश बाबा आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे इत्यादी मान्यवरांनी विचार मांडले.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संपूर्ण महाराष्ट्राचा साहित्यिक आणि सांस्कृतिक पिंड घडविण्यात जे काही अग्रणी लोक होते त्यांच्यातील ग्रामीण जीवनावर भाष्य करणारे ना. धों. महानोर एक महत्त्वाचं नाव आहे असे मत व्यक्त केले.

ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी आपल्या व्याख्यानातून त्यांच्या कवितेचा जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखवला. कोरोना महामारीच्या काळात आभासी माध्यमातून विद्यार्थ्यांशी बोलताना, 'एका बाजूला आनंद आहे आणि दुसऱ्या बाजूला शून्यता आहे' असे ते म्हणाले. 'हजारो रसिकांच्या समोर कविता सादर करणे व आभासी माध्यमातून कंप्यूटर समोर बसवून शून्यात बोलल्यासारखे एकट्यानेच बोलणे यामध्ये फरक आहे' असेही ते म्हणाले. 'कवितेची परंपरा समृद्ध करण्यासाठी पुढच्या पिढीने अधिकाधिक वाचन केले पाहिजे तसेच मराठी साहित्यातील महत्त्वाचे कवी व त्यांच्या कवितांचे साकल्याने अध्ययन केले पाहिजे' असे ना. धों. महानोर यावेळी म्हणाले. वारकरी संत परंपरा, लोकसंगीत, ओव्या, भजन, भारुड, कीर्तन इत्यादी लोकपरंपरेमधून त्यांच्या कवितेचा पिंड जोपासला गेला असे ते म्हणाले. याप्रसंगी त्यांनी विधानपरिषदेवर आमदार म्हणून निवडून गेले असताना मांडलेल्या, 'पाणी अडवा पाणी जिरवा'. तसेच पु. ल. देशपांडे कला अकादमी इत्यादी महत्त्वाचे ठराव पारित केल्याबद्दल सांगितले.

आजदेखील ज्येष्ठ साहित्यिक रंगकर्मी कवी इत्यादी मंडळींना विधानपरिषदेवर योग्य निकषाच्या आधारे घेऊन राज्याच्या सांस्कृतिक उत्थानात महत्त्वाचे योगदान सरकारने दिले पाहिजे असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

त्यांनी पु. ल. देशपांडे, लता मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, व्ही. शांताराम, श्याम बेनेगल यांच्यासोबत केलेल्या कामाचे आणि त्यांच्या कवितांच्या प्रवासातले अनुभव सांगितले.

औरंगाबाद जिल्ह्यातील बौद्ध लेणी जवळ स्थित असलेल्या त्यांच्या पळसखेड या खेडेगावातल्या

जन्मापासून ते आजपर्यंतची त्यांनीं सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात केलेल्या कामगिरीची थोडक्यात माहिती दिली.

महानोरांनी आपल्या आईला आपले प्रेरणास्थान मानून; कशाप्रकारे आईच्या मांडीवर बसून लहानपणी दळण दळतादळता आणि तिच्या ओव्या आणि गाणे ऐकता-ऐकता कसे आपण घडलो याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले. ''शेत ही माउली प्रमाणे आहे आणि त्या माउलीला कधी दुखवू नका'' असा संदेशही त्यांनी प्रेक्षकांना दिला. त्याचबरोबर व्याख्यानमालेत पुढे बोलताना ते गावातील ओव्या, झोपाळ्यावरची गाणी, कीर्तनकार, विठ्ठलात दंग झालेले गाव, वाचलेली पुस्तकं आणि या सर्वांचे त्यांच्या जडणघडणीवर झालेले संस्कार याबद्दलही भरभरून बोलले.

**या नभाने या भुईला दान द्यावे**
**आणि या मातीतुनी चैतन्य गावे**
**कोणती पुण्ये अशी येती फळाला**
**जोंधळ्याला चांदणे लगडून जावे!**

या कवितेच्या ओळी म्हणत असताना शेती आणि शेतीशी असलेले त्यांचे ऋणानुबंध याबद्दल ते भरभरून बोलले. त्यानंतर पु. ल. देशपांडे, यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर घडलेले अनेक प्रसंग त्यांनी विद्यार्थी आणि प्रेक्षकांसमोर मांडले.

उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे यांनी महानोर व लतादीदी आणि हृदयनाथ मंगेशकर यांच्यातील ऋणानुबंधाच्या संदर्भात प्रश्न विचारला असता महानोरांनी आपण प्रकाश झोतात आल्यावर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांची घेतलेली दखल याबद्दल सांगितले. त्यांनी 'जैत रे जैत' या चित्रपटाच्या निमित्ताने लिहिलेली विविध गाणी आणि हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर यांच्याशी निर्माण झालेले ऋणानुबंध याबद्दलही ते बोलले. प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी मराठी चित्रपट सृष्टीतील अनेक गाणी ना. धों. महानोर यांनी लिहिली आहेत. गाण्यांच्या आठवणींविषयी सांगताना ज्येष्ठ मंडळींकडून केलेल्या कौतुकाबद्दलदेखील त्यांनीं सांगितले. ''शेती इतकं पवित्र आणि समृद्ध असं काही नाही. फक्त पाणी हवं '' असंही ते म्हणाले.



या व्याख्यानाचे आयोजन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या व्याख्यानाला संस्थेचे पदाधिकारी, पत्रकार, विभाग प्रमुख, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे व अनेक प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही मुलाखत फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून सर्वांना उपलब्ध करण्यात आली. जवळपास एक हजार विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या संयोजनाची जबाबदारी उपप्राचार्य व डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला समितीचे प्रमुख डॉ. महेश पाटील यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. प्रा. प्राची नितनवरे, प्रा. नीतिन पागी, दिव्येश बापट यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.

**बीएमएम/बीएएमएमसी विभाग : आय. टी. क्षेत्रातील कौशल्याचा विकास या विषयावरील मूल्यवर्धित कोर्स**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय,

ठाणे मार्फत ७ डिसेंबर, २०२०, सोमवार रोजी दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी 'झूम' या माध्यमांद्वारे 'आय.टी. क्षेत्रातील कौशल्याचा विकास' या विषयावरील मूल्यवर्धित कोर्सवरील अभिमुखता कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

सध्याच्या काळात जसे आपण पाहात आहोत की, संगणक आणि इंटरनेट आपल्या दैनंदिन जीवनात अपरिहार्य बनले आहे. तर, करिअरमध्ये टिकण्यासाठी किंवा यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी आणि प्रौढांसाठी हे मूलभूत संगणक ज्ञान खूप महत्त्वाचे आहे या हेतूने या कोर्सची आखणी करण्यात आली होती. तसेच या कोर्सच्या मार्गदर्शक प्राध्यापिका प्राची नितनवरे होत्या. डॉ. महेश पाटील, समन्वयक (बीएमएम / बीएएमएमसी) यांनी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच हा कार्यक्रम फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**जिमखाना व क्रीडा अकादमी :३ दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे च्या जिमखाना व क्रीडा अकादमीद्वारे १४ डिसेंबर, २०२० ते १६ डिसेंबर, २०२० या कालावधीत डाएट, न्यूट्रिशन, फिटनेस, योग, ध्यान या विषयांवर ३ दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन केले होते.

डॉ. आरती खाडिलकर (प्रख्यात डॉक्टर, योग, ध्यान, आहार आणि पोषण तज्ज्ञ) यांनी मार्गदर्शन केले. या व्याख्यानमालेसाठी गुगल फॉर्ममार्फत नोंदणी करण्यात आली होती. तसेच सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना ई प्रमाणपत्र देण्यात आले.

**रिसर्च कमिटी: अतिथी व्याख्यान**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणेच्या संशोधन समितीमार्फत दि. ८ डिसेंबर, २०२० रोजी ३ वाजून ४५ मिनिटांनी 'स्कॉपस इंडेक्स्ड जर्नल्समध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधन लिखाणाचे आवश्यक साहित्य' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. शुभ्रा दत्ता यांना आमंत्रित करण्यात आलं होतं. हा कार्यक्रम गुगल मीट या प्लॅटफॉर्ममार्फत पार पाडण्यात आला.

सेल जीवशास्त्र आणि औषध शोध क्षेत्रातील शैक्षणिक आणि कॉर्पोरेट संशोधनाचा १५ वर्षांहून अधिक अनुभव असणाऱ्या डॉ. शुभ्रा दत्ता यांनी मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी सर्व जागतिक औषधी कंपन्यांसह कार्य केले आहे आणि विविध क्लिनिकल परिस्थिती आणि रोगांचे निराकरण करण्यात योगदान दिले आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली रिसर्च कमिटीने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**बी. कॉम विभाग (लेखा व वित्त) : ब्रिज कोर्स आयोजित**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे येथे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज ब्रोकर फोरमच्या संयुक्त विद्यमाने 'बेसिक्स इन इनोव्हेटिव्ह फायनान्शियल सर्व्हिसेस' या विषयावर एक ब्रिज कोर्स आयोजित केला गेला. हा कोर्स कार्यान्वित करण्यासाठीचे हे तिसरे वर्ष होते. मार्केट आणि सर्व्हिस सेक्टरमध्ये होणाऱ्या विकासाकडे लक्ष देऊन या कोर्सची आखणी करण्यात आली असून कोर्सचा कालावधी १५ तासांचा होता. २० नोव्हेंबर २०२० ते ६ डिसेंबर २०२० पर्यंत प्रथम वर्षीय बीएएफ, प्रथम वर्षीय बीएमएस

मधील एकूण ५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील प्रख्यात वक्त्यांद्वारे ही सत्रे घेण्यात आली.

पारंपरिक वित्तीय सेवा विरुद्ध आधुनिक वित्तीय सेवा, इश्यू इंटरमीडियरीज, प्लॅस्टिक मनी, क्रेडिट रेटिंग, स्टॉक ब्रोकिंग, स्टॉक मार्केट लाइव्ह सेशन आणि फायनान्शियल सर्व्हिस सेक्टरमधील कृत्रिम बुद्धिमत्ता या अभ्यासक्रमांचा या कोर्समध्ये समावेश होता. दिनांक ६ डिसेंबर २०२० रोजी, रविवारी दुपारी ३ वाजता गुगल मीट या प्लॅटफॉर्मद्वारे कोर्सचे 'व्हेलेडिक्टरी फंक्शन' आयोजित करण्यात आले. अधिवेशनाचे वक्ते डॉ. अदित्य श्रीनिवास (मुख्य कार्यकारी अधिकारी, बीएसई मधील मुख्य अर्थशास्त्रज्ञ, ब्रोकर फोरम हेड इंटरनॅशनल बिझिनेस डिव्हिजन) हे होते. त्यांनी वित्तीय सेवा क्षेत्र आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन या संकल्पनेचा विस्तार केला. त्याचप्रमाणे व्यवसायातील सक्षम तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले आणि आर्थिक सेवा क्षेत्रातील वाढ आणि करिअर याबद्दल सांगितले. तसेच प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

**आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा**

'विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे' आणि 'हेल्पएज इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० डिसेंबर, २०२० रोजी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा करण्यात आला असून सायंकाळी ४ ते ५:३० ही या कार्यक्रमाची वेळ होती. 'मानवाधिकार दिन संवाद - ज्येष्ठ नागरिकांशी संवाद' या नावांतर्गत हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

मातोश्री ओल्ड होम या दोन वृद्धाश्रमांमधील ज्येष्ठ नागरिक-खडवली आणि आनंद ओल्ड एज होम, पालघर यांनी प्रत्यक्षात भाग घेतला आणि प्रतिभा अकादमीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला संगीत कार्यक्रम आणि समुपदेशन कक्षाद्वारे आयोजित केलेल्या उपक्रमांचा आनंद घेतला.

एस. वाय. बीकॉमच्या विद्यार्थ्यांनी मानवाधिकार आणि वृद्ध लोक या संकल्पनेवर प्रकाश टाकला. ज्येष्ठ नागरिकांनी या कार्यक्रमाचे खूप स्वागत केले आणि त्यांचा आनंद लुटला. जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रकाश बोरगांवकर, हेड महाराष्ट्र आणि गोवा हेल्पएज इंडिया यांनी देखील या कार्यक्रमात मोलाचे सहकार्य केले.

**व्हर्च्युअल प्री कॉन्फरन्स कार्यशाळेचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणेच्या अकाउंटन्सी विभागाद्वारे ११ डिसेंबर २०२०, रोजी आयसीएआयच्या डब्ल्यूआयआरसीची ठाणे शाखा आणि भारतीय लेखा संघटनेच्या ठाणे शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सची प्रस्तावना म्हणून विद्यार्थ्यांसाठी व्हर्च्युअल प्री कॉन्फरन्स कार्यशाळेचे आयोजन केले होते.

१६ जानेवारी, २०२१ रोजी होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'ट्रेन्डस, टॅक्सेशन, फायनान्स आणि ऑडिटिंग' या विषयावर चर्चा होणार आहे.

हे ऑनलाईन वर्कशॉप विनामूल्य असून ऑनलाईन कार्यशाळेची यशस्वी पूर्तता झाल्यानंतर सहभागींना ई-प्रमाणपत्रे देण्यात आले. या ऑनलाइन कार्यशाळेचा लाभ घेण्यासाठी प्राध्यापक, व्यावसायिक, चार्टर्ड अकाउंटंट्स, विद्यार्थी व इतर इच्छुक मंडळीदेखील सहभागी झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता. विभाग प्रमुख सीए प्रा. योगेश प्रसादे प्रा. वाढविंडे , प्रा. मधुरा जोशी यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**अल्पसंख्याक हक्क दिन**

दि. १८ डिसेंबर, २०२० रोजी अल्पसंख्याक हक्क दिन असल्याने विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे येथे तत्त्वज्ञान विभाग, पॉलिटिकल विभाग, विज्ञान विभाग, बिझिनेस लॉ, डीएलएलई आणि स्टुडंट्स फोरम यांनी संयुक्तपणे दि. १९ डिसेंबर, २०२० रोजी गुगल मीट या ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला. 'भारतातील अल्पसंख्याक हक्कांविषयी जागरूकता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

डॉ. प्रज्ञा व्ही. राजेबहादूर यांनी संसाधन व्यक्ती ही भूमिका बजावली. हा कार्यक्रम सकाळी ८:३० ते ९:३० या कालावधीत पार पडला. डॉ. राजेबहादूर यांनी सर्वांना अत्यंत महत्त्वाची माहिती सांगितली. या कार्यक्रमास जवळपास ९५ विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शवली होती. त्याचप्रमाणे डॉ. संगीता एस. मोहान्ती, प्राध्या. सिंधू नतुवेत्ती व प्राध्या. स्वप्नील मयेकर देखील या कार्यक्रमास हजर होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**बँक आणि इन्शुरन्स मार्केटींग मधील ब्रिज कोर्स**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणेच्या बँकिंग अँड इन्श्युरन्स डिपार्टमेंटने १४ डिसेंबर, २०२० रोजी सकाळी ११:३० वाजता गुगल मीट या प्लॅटफॉर्मद्वारे बँक आणि इन्शुरन्स मार्केटींग मधील 'ब्रिज कोर्स आणि बँक आणि इन्शुरन्स परीक्षांच्या पूर्वतयारी चरणांवर ब्रिज कोर्स'चे आयोजन केले होते.

मेघदूत कर्णिक, (प्रमुख विशेष पुढाकार, बीएफएसआय सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडिया) हे या विषयावरील वेलिडिक्टरीचे अध्यक्ष होते. त्यांनी अपेक्षित असलेल्या मुद्यांवर-जसे की वाटाघाटी, संप्रेषण, विश्लेषणात्मक कौशल्ये इत्यादी. आणि नोकरीवर लवचिकता आणि सतत उन्नतीसाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे यावर जोर दिला.

बीबीआई समन्वयक, डॉ. मृण्मयी थत्ते यांनी प्रश्नोत्तराच्या सत्राचे संचालन केले. दोन्ही अभ्यासक्रमांमधील एकूण ४७ विद्यार्थ्यांनी या सत्राचा लाभ घेतला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**'ग्राहक हक्क' या विषयावर आंतरमहाविद्यालयीन 'प्रश्नमंजुषा स्पर्धा'**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणेच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागातर्फे (डीएलएलई) १५ डिसेंबर, २०२० रोजी 'ग्राहक हक्क' या थीमवर आंतरमहाविद्यालयीन 'प्रश्नमंजुषा स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयातील जवळपास ३०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्रत्येक सहभागीला ई-प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी डॉ. संगीता एस. मोहान्ती (अध्यक्ष डीएलएलई) यांनी तसेच डीएलएलईच्या व संपूर्ण टीमने खूप मेहनत घेतली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**जोशी-बेडेकर महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा प्राप्त**

विद्यापीठ अनुदान आयोगाने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून दहा वर्षांसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाला स्वायत्तता प्रदान केली आहे.

---

दुसऱ्यांनी फेकून मारलेल्या दगडविटांच्या पायावर जो इमारत उभी करू शकतो तो खरा यशस्वी माणूस!

विश्व विद्यालय अनुदान आयोग यांच्या तज्ज्ञ समितीने महाविद्यालयाला भेट देऊन संपूर्ण पाहणी करून, स्वायत्त दर्जा दिला ही महाविद्यालयाच्या दृष्टीने एक महत्त्वाची बाब आहे.

विद्या प्रसारक मंडळ, व्यवस्थापन आणि खास करून डॉ. विजय बेडेकर सर यांचे मार्गदर्शन व प्रेरणेबद्दल प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांनी त्यांचे आभार मानले. तसेच परिश्रम घेऊन आपल्या कॉलेजला ठाण्यातील शिक्षणाचे केंद्र बनवण्याचा संकल्प करू या. या शब्दांत प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांनी अनुदानीत तसेच विनाअनुदानीत विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले.

**डॉ. सुचित्रा ए. नाईक प्रतिष्ठित सावित्री पुरस्काराने सन्मानित**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांना समाजसेवा, समुपदेशन व शिक्षण क्षेत्रात अतुलनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रतिष्ठित सावित्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

हा पुरस्कार डीबीजे कॉलेज, चिपळूण, रत्नागिरीमधील इतिहास विभागप्रमुख डॉ. ज्ञानोबा कदम यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय विद्यार्थी परिषद या संस्थेमार्फत देण्यात आला आहे.

**'मानसशास्त्रातील मूलभूत गोष्टी' मधील ब्रिज कोर्सचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाद्वारे दि. २ डिसेंबर २०२० रोजी 'मानसशास्त्राच्या मूलभूत गोष्टी' मधील ब्रिज कोर्सचे आयोजन करण्यात आले. या कोर्समध्ये १० तास इतका कालावधी आखण्यात आला होता.

प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक, प्राध्या. वेदवती परांजपे, प्राध्या. सुरभी खरे, प्राध्या. मनीषा पांडे यांनी या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या कोर्समध्ये एफवायबीए मनोविज्ञानचे ३२ विद्यार्थी उपस्थित होते.

**महात्मा गांधी नॅशनल काउन्सिल फॉर रूरल एज्युकेशन (एमजीएनसीआरई), उच्च शिक्षण विभाग : 'ग्रामीण व्यवस्थापन' कार्यासंदर्भात एक बैठक**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर महाविद्यालय आणि महात्मा गांधी नॅशनल काउन्सिल फॉर रूरल एज्युकेशन (एमजीएनसीआरई), उच्च शिक्षण विभाग, जीओआय यांनी 'ग्रामीण व्यवस्थापन' वरील सहयोगी कार्यासंदर्भात एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीस एमजीएनसीआरईचे संचालक प्रो. चेतन चित्तलकर, जोशी बेडेकर महाविद्यालय प्राचार्या डॉ. सुचित्रा ए. नाईक, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्राध्या. शिवाजी नाईक, डीएलएलई अध्यक्षा डॉ. संगीता मोहान्ती, बीएमएस समन्वयक प्राध्या. नीतिन पागी, प्राध्या. डॉ. विनोद चांदवानी, प्राध्या. डॉ. इंद्राणी रॉय आणि प्राध्या. स्वप्निल मयेकर यांच्यासह ५० विद्यार्थी हजर होते.

सत्राच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. सुचित्रा ए. नाईक यांनी विद्या प्रसारक मंडळ आणि आमच्या महाविद्यालयाचा आढावा घेतला. एनएसएस समन्वयक आणि डीएलएलई चेअरपर्सन यांनी दत्तक घेतलेल्या गावात ताकी पठार येथे विविध क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रम आणि ग्रामविकास उपक्रम राबविण्याची त्यांची योजना सादर केली. एमजीएनसीआरईचे संचालक, प्रोफेसर चेतन चित्तलकर यांनी सामान्य गावाला स्मार्ट व्हिलेज म्हणून रूपांतरित करण्यासाठी कृतीची सविस्तर योजना दिली. त्यांनी

वेळ आणी शिक्षक हे दोन्ही जीवनातील खूप मोठे गुरू आहेत, कारण शिक्षक हे धडा शिकवून परीक्षा घेतात, पण वेळ आधी परीक्षा घेते नंतर धडा शिकवते!

ग्रामीण व्यवस्थापनावरील अल्प मुदतीचा अभ्यासक्रम सुरू करण्याची सूचना केली.

विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या सदस्यांनी प्रा. चित्तळकर यांच्याशी संवाद साधून बैठक संपली. सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य केल्याबद्दल आणि ही बैठक यशस्वी केल्याबद्दल प्रा. डॉ. सुचित्रा ए. नाईक यांनी सर्वांचे आभार मानले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे 'वित्त, लेखा, कर व अंकेक्षणातील नवे विचार प्रवाह' या विषयावर १६ जानेवारी २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने दिनांक १६ जानेवारी २०२१ रोजी 'वित्त लेखा कर व अंकेक्षणातील नवे विचार प्रवाह' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी-बेडेकर महाविद्यालय मागच्या पन्नास वर्षांपासून उच्च शिक्षणामध्ये नवनवीन कीर्तिमान स्थापित करत आहे. महाविद्यालयाने नुकतेच सुवर्णमहोत्सवी वर्ष देखील साजरे केले.

कोरोना महामारीच्या प्रादुर्भावानंतर वित्त, कर आकारणी, लेखापरीक्षण व अंकेक्षण या अर्थविषयक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये अनेक नवीन घडामोडी घडत आहेत. याचा अभ्यास व्हावा व या क्षेत्रातील तज्ज्ञ अभ्यासकांच्या उपस्थितीत सांगोपांग विचारमंथन व्हावे या हेतूने महाविद्यालयाचा लेखा विभागातर्फे या परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या कामात इंडियन अकाउंटिंग असोसिएशनच्या व द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया ठाणे शाखेचे सहकार्य लाभत आहे.

वित्त, लेखा व कर आकारणी मध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, ब्लॉक चेन, सायबर सिक्युरिटी इत्यादी नवीन तंत्रज्ञानाचा सध्या उपयोग होत आहे. नवीन उद्योगधंद्यांच्या स्थापनेपासून कार्य विस्तारामध्ये वित्त लेखा व कर आकारणी क्षेत्रामध्ये कॉम्प्युटर ऑटोमेशन व समाज माध्यमांचा वाढता वापर इत्यादी नवीन तंत्रज्ञानाचा जोमाने वापर होत आहे. कोरोनोत्तर काळामध्ये होणाऱ्या या नव्या बदलांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी व सुबुद्ध नागरिक या सर्वांनी एकत्र येऊन विचार मंथन करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे असे महाविद्यालयाच्या लेखा विभागाचे प्रमुख सीए डॉ. योगेश प्रसादे यांनी सांगितले. या परिषदेत अर्थ विषयक चर्चा व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसाधारण नागरिकांचे जीवन अधिक सुखकर करण्यासाठी काय करता येईल याचे चिंतन होईल असा विश्वास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केला.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ अजय भामरे, इंडियन अकाउंटिंग असोसिएशन ठाणे शाखेचे अध्यक्ष डॉ अरविंद लुहार व ज्येष्ठ सनदी लेखापाल सीए सुरेन ठाकूरदेसाई, ब्रिम्सचे डॉ. नीतिन जोशी, प्राचार्य विनय भोळे व डॉ. किशोर पीशोरी यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे आयोजन आभासी माध्यमातून करण्यात आले असून परिषदेचे थेट प्रक्षेपण यू ट्यूबवर करण्यात येईल.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी तज्ज्ञ संशोधक व अभ्यासकांनी आपले शोधनिबंध पाठवावे असे आवाहन

---

छापलेली पुस्तके वाचल्याने खरे ज्ञान मिळत नाही; अनुभवाचे पुस्तक वाचल्याने खरे ज्ञान मिळते. कारण छापलेल्या पुस्तकांचे लेखक अनेक असतात, पण अनुभवाच्या पुस्तकाचे लेखक आपण स्वत: असतो..!

प्रा. नीतिन वाडविंदे व प्रा. मधुरा जोशी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ९९३०३१६५४९ या क्रमांकावर साधावा.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमाले अंतर्गत Electron Microscope : An Indispensable Tool In Biological Investigations.

प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने डॉ. वा.ना. बेडेकर व्याख्यानमाले अंतर्गत Electron Microscope. या विषयावर डॉ. मनोज बोरकर यांचे व्याख्यान ३० नोव्हेंबर २०२० रोजी संपन्न झाले. डॉ. मनोज यांनी मायक्रोस्कॉपी मेथडोलॉजी या विषयावर सर्वांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी Cytoarchitecture ही संकल्पना अतिशय विस्तृतपणे समजावून सांगितली. या बरोबरच स्पॉटेड डियर, लेपर्ड व सांबर या विविध प्राण्यांच्या स्ट्रक्चरवर प्रकाश टाकला.

### अनुबंध माजी विद्यार्थी संघाची बैठक

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघ 'अनुबंध' यांची बैठक विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्याबरोबर १२ डिसेंबर २०२० रोजी बैठक संपन्न झाली. माजी विद्यार्थी संघाला बळकटी आणण्याकरता सर्वप्रथम प्रयत्न करण्यात यावेत, असे मुख्यत्वे डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितले.

सध्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात माजी विद्यार्थ्यांनी आपला सहभाग कशाप्रकारे नोंदवता येईल यावर देखील चर्चा केली. या बैठकीला १२ जण उपस्थित होते.



### Nigeria : Culture, Economic and Education या विषयावर व्याख्यान

ह्यूमन सायन्स व इंटरडिसिप्लिनरी सायन्स या विभागांच्या संयुक्तविद्यमाने डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमाले अंतर्गत १२ डिसेंबर २०२० रोजी "Nigeria : Culture, Economic and Education" या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले. यावेळी फॅवले क्लीमेंट यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

डॉ. फॅवले यांनी नायजेरियातील संस्कृती आर्थिक व्यवस्था, शिक्षण विविध शहरे याबद्दल विचार मांडले.

### 'Wetland : Our Lifetime' या विषयावर व्याख्यान

ह्यूमन सायन्स विभाग, इंटरडिसिप्लिनरी विभाग आणि अनुबंध माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्तविद्यमाने डॉ. वा.ना. बेडेकर व्याख्यानमाले अंतर्गत १९ डिसेंबर २०२० रोजी "Wetland : Our Lifetime" या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले. क्लारा कॉरिया, पक्षीतज्ज्ञ यांनी यावेळी मार्गदर्शन केले. सुरुवातीला त्यांनी भेट दिलेल्या विविध पाणथळ प्रदेशाची छायाचित्रं दाखविली. ठाणे शहरातील पाणथळ प्रदेशाबद्दल त्यांनी माहिती दिली. पाणथळ प्रदेशाचे पर्यावरणातील महत्त्व विशद करून सांगितले.

### माजी विद्यार्थी कर्नल विशाल अरोरा यांचे व्याख्यान

बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालयचे माजी विद्यार्थी कर्नल विशाल अरोरा ज्यांनी १९९६

पैज लावायचीच असेल तर स्वतःसोबत लावा, कारण जिंकला तर स्वतःचा आत्मविश्वास जिंकाल, आणि हरला तर स्वतःचाच अहंकार हाराल . . .

साली बांदोडकर महाविद्यालयातून पदार्थ विज्ञान या विषयातून पदवी संपादन केली. यांनी बांदोडकर महाविद्यालयाला दिनांक २१ डिसेंबर २०२० रोजी प्रत्यक्ष भेट दिली व विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला.

कर्नल विशाल अरोरा यांनी १९९७ साली इंडियन मिलिटरी अकॅडमी जॉईन केली. आजवर नॉर्थ ईस्ट रिजन, जम्मू अँड काश्मीर, दिल्ली आणि देवळाली इत्यादी ठिकाणी त्यांचे पोस्टिंग झालेले आहे. सध्या ते दोन वर्षांचा फुल टाईम एमबीए प्रोग्राम 'सप्लाय चेन मॅनेजमेंट' या विषयात करत आहेत.

करोनाच्या काळात सोशल डिस्टंसिंगच्या नियमांचे पालन करून कर्नल विशाल अरोरा यांचे व्याख्यान बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात संपन्न झाले. यावेळी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सी.जी. पाटील, डॉ. मनोहर न्यायते व प्रा. डी.आर. चौधरी हे माजी शिक्षक आवर्जून उपस्थित होते. यावेळी या माजी शिक्षकांनी त्यांचे अनुभव मांडले.

आपले ध्येय निश्चित असेल तर आपण ती गोष्ट तडीस नेऊ शकतो हा विश्वास सुरुवातीलाच कर्नल अरोरा यांनी त्यांच्या बोलण्यामधून विद्यार्थ्यांना दिला. आयुष्यात एखाद्या गोष्टीची आवड व त्याबद्दलचे सखोल ज्ञान आपल्याला यशस्वी करण्यास कारणीभूत ठरते. सध्याच्या आभासी जगात संवाद हरवला आहे, पण आपण कायम एकमेकांशी संवाद साधणे हे अतिशय आवश्यक आहे हे त्यांनी उदाहरणादाखल समजावून सांगितले. स्वयंम् शिस्तीचे महत्त्व त्यांनी पटवून दिले, तर त्यांच्या २३ वर्षांच्या कारकीर्दीतील काही प्रेरणादायी किस्से त्यांनी सर्वांसमोर मांडले. कोणतीही परिस्थिती असली तरी उमेदीने उभे राहिले पाहिजे हा मोलाचा संदेश त्यांनी सर्वांना दिला.

देशसेवा करावी हे प्रत्येकाचे स्वप्न असते, परंतु त्याकरता सैन्यात भरती होण्याची संधी प्रत्येकालाच मिळते असे नाही. पण तरीही निराश न होता प्रत्येकाने आपले काम प्रामाणिकपणे आपण आहोत त्या क्षेत्रात केले पाहिजे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी देखील आपल्या मनातल्या शंका कर्नल विशाल यांना विचारून त्यांचे निरसन केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मैत्रेयी साहा, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले. तर माजी एन.सी.सी. ऑफिसर डॉ.विंदा मांजरमकर यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी आपले मनोगत मांडले. या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन लेफ्टनंट बिपिन धुमाळे यांनी केले.



**Bloom's Taxonomy**

विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय, ठाणे व डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने "Bloom's Taxonomy" या विषयावर ४ जानेवारी २०२१ पाणिनी सभागृहात कार्यशाळा संपन्न झाली.

डॉ.पल्लवी चांदवसकर, सहाय्यक प्राध्यापक, डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन महाविद्यालय यांनी सर्वांना "Bloom's Taxonomy" या विषयावर कार्यशाळेच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. Bloom's Taxonomy ची मॉडेल्स त्यांनी विस्तृतपणे समर्पक उदाहरणांचे दाखले

देऊन समजावून सांगितली. एका शॉर्ट फिल्म वर आधारित एका एक्टिव्हिटी सभासदांनी या कार्यशाळेत पूर्ण केली. Blooms Taxonomy चा वापर रोजच्या अध्यापनाच्या प्रक्रियेत कसा करता येईल याचे अनेक दाखले पल्लवी मॅडमने दिले. सभासदांनी देखील प्रश्नोत्तराच्या माध्यमातून आपल्या शंकांचे निरसन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऐश्वर्या देशमुख, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग यांनी केले. तसेच श्री आदित्य, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यशाळेला २६ लोकांनी प्रत्यक्षपणे उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

मुंबई विद्यापीठाच्या विधी परीक्षा दिनांक २५ नोव्हेंबर २०२० ते ९ डिसेंबर २०२० पर्यंत विधी पदवीच्या सत्र १ ते ६ या सर्व सत्राच्या ऑनलाईन परीक्षा घेण्यात आल्या. या सर्व परीक्षा महाविद्यालयाने अतिशय व्यवस्थितपणे पार पाडल्या.

दिनांक ३१ ऑक्टोबर २०२० रोजी महाविद्यालयामध्ये कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीची बैठक घेण्यात आली. ही बैठक महाविद्यालयाच्या कॉन्फरन्स रूममध्ये आयोजित केली असली तरी गुगल मीट या ऑनलाईन मंचाच्या माध्यमातून घेण्यात आली होती.

७ नोव्हेंबर २०२० – IQSC मीटिंग दिनांक ७ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयामध्ये IQSC बैठक घेण्यात आली होती. या बैठकीसाठी ही गुगल मीट या ऑनलाईन मंचाचा उपयोग करण्यात आला होता.

विशेष कार्यक्रम – दिनांक ९ नोव्हेंबर २०२० रोजी महाविद्यालयाने 'लिंग संवेदीकरण' (जेन्डर सेनसिटायजेशन) या शीर्षकाखाली, 'महिला सक्षमीकरण, महिला सुरक्षा आणि महिला आरोग्य' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

विशेष मराठी शिकवणी वर्ग – नोव्हेंबर २०२० मध्ये द्वितीय विधीच्या विद्यार्थ्यांसाठी गुगल मीटच्या माध्यमातून विशेष शिकवणी वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

विषय : १) प्रशासकीय कायदा – प्रो. विनोद वाघ

२) कौटुंबिक कायदा – २ – ॲड. मि. अंबर जोशी

३) मालमत्ता हस्तांतरण कायदा – मिस. हेतल मिशेरी

४) कंपनी कायदा – मिस. रुपाली येरनेस आणि मि. यतीन पंडित.

अभिरूप न्यायालय स्पर्धा – ICFAI विधी महाविद्यालयाने हैद्राबाद येथे आयोजित केलेल्या ऑनलाईन अभिरूप न्यायालय स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या वैष्णवी पाष्ठे, अनामिका भंभानी आणि चिराग पगे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

संविधान दिवस – दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजी महाविद्यालयाने संविधान दिनानिमित्त वरिष्ठ अधिवक्ता ॲड. राम आपटे यांचे संविधानावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते. हे व्याख्यान गुगलमीट या ऑनलाईन माध्यमातून घेण्यात आले होते. १ तास चाललेल्या व्याख्यानामध्ये श्री. आपटे यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वाची माहिती दिली.

माझे संविधान माझी दुरुस्ती – महाविद्यालयाने संविधानानिमित्त विद्यार्थ्यांस संधी मिळाल्यास 'ते कुठली दुरुस्ती सुचवतील' असा विषय ठेवला होता. या कार्यक्रमामध्ये १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यांनी अभ्यासपूर्वक दुरुस्त्या सुचवल्या व त्याची कारणे

सांगितले. डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्रा. विनोद वाघ यांनी सदर दुरुस्तींवर त्यांचे मत मांडले. कार्यक्रमाचे संचालन मिस. रुपाली येरनेस यांनी केले.

**अनुशेष परीक्षा मे २०२०**

मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार मे २०२० च्या अनुशेष परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर २०२० मध्ये घेण्यात आल्या. २०१९-२० च्या सत्र-२ आणि सत्र-४ च्या नियमित विद्यार्थ्यांच्या अंतर्गत गुण आणि मागील सत्रातील सरासरी गुणांच्या आधारे निकाल देण्यात आला. अनुशेष परीक्षा २५ नोव्हेंबर, २०२० ते ११ डिसेंबर २०२० या कालावधीत घेण्यात आल्या.

**वेबिनार केळकर-वझे महाविद्यालय**

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना केळकर वझे महाविद्यालयाने वेबिनार द्वारे ''शिकवणे-एक मानवी हक्क शिक्षण'' या विषयावर भाष्य करण्यास आमंत्रित केले होते. १० डिसेंबर, २०२० रोजी मायक्रोसॉफ्ट टीम्स ऑनलाईन होती.

**अल्पसंख्यांकाच्या हक्कांबद्दल वेबिनार**

१८ डिसेंबर, २०२० रोजी अल्पसंख्यांकांच्या हक्कांबद्दल वेबिनार द्वारे आयोजित करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्राध्यापक विनोद वाघ यांनी गुगल मीट द्वारे अल्पसंख्यांकाचा मानवाधिकार आणि त्यांच्या घटनात्मक संरक्षणाविषयाचे सत्र विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते.

**प्रात्यक्षिक परीक्षा**

प्रात्यक्षिक परीक्षा (लेखी भाग) १८ डिसेंबर २०२० रोजी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली.

**नियमित परीक्षा व अनुशेष परीक्षा**

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार ऑक्टोबर २०२० च्या नियमित परीक्षा व अनुशेष परीक्षेचे वेळापत्रक २६ डिसेंबर २०२० पासून सुरू झाले. परीक्षा ऑनलाईन असून प्रगती पथावर आहे.

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**

**रोटरी युथ लिडरशिप ॲवॉर्डस्**







रोटरी क्लब ऑफ ठाणे, रोटरॅक्ट क्लब ऑफ ठाणे, व व्ही.पी.एम. पॉलिटेक्निक ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''Enterpreneurship'' या विषयावर एक दिवसीय २३ डिसेंबर २०२० रोजी ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर ''रोटरी युथ लिडरशिप ॲवॉर्डस्''चे आयोजन केले होते.

वरील कार्यक्रम ३ सत्रात सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या उद्घाटनात व्ही.पी.एम. पॉलिटेक्निकचे

प्राचार्य डॉ. डी. के. नायक, रोटरी क्लबचे अध्यक्ष विजय चाफेकर, डॉ. उषा राघवन (व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकच्या इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभागप्रमुख) व डॉ. संजीव कदम हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.



प्रथम सत्रात ॲड. आनंद महारकर यांनी ''Intellectual Property Rights'' या विषयांतर्ग पेटंट, ट्रेडमार्क्स, इंडस्ट्रीयल डिझाईन, कॉपी राईट या विषयीच्या चर्चासत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्राात डॉ. संतोष घारपुरे यांनी ''Enterpreneurship and Motivation'' या विषयांतर्गत विद्याार्थ्यांना कशा पद्धतीने एक यशस्वी उद्योजक होऊ शकतील या विषयावर मार्गदर्शन केले.

तृतीय सत्रात कमल कपूर यांनी ''Importance of Creativity'' या विषयावर सादरीकरण केले. 'यशस्वी उद्योजक होण्यासाठी सर्वात मोठी संपत्ती 'कल्पना' आहे. तसेच नवीन कल्पना वास्तवात येण्यासाठी स्वतःचे आत्मपरिक्षण करण्याची आवश्यकता असते' असेही त्यांनी विद्यार्थ्यांना सुचविले.

कार्यक्रमाच्या शेवटी स्पर्धेच्या विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली.

रायला किंग : दिशा प्रवीण क्षत्रिय (तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम)

रायला क्विन : जिज्ञास बाळश्रीराम कोंडे (द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम)

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**डिसेंबर – २०२० मधील कार्यक्रम / वार्ता**

३ डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांनी २०२०-२१ च्या बॅचमधील पाच विद्यार्थ्यांना कमर्शियल बँकिंगच्या प्रोफाइलसाठी ३.८ लाखांच्या पॅकेजसह ॲक्सिस बँकेत रोजगार संधी मिळवून दिल्या.

भाग्येश जरीवाला, एमएमएस फायनान्स

विराज मोरे, एमएमएस फायनान्स

रक्षा शेट्टी, एमएमएस फायनान्स

रचना गायकवाड, एमएमएस फायनान्स

पूजा गौंडर, एमएमएस फायनान्स


४ डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांचा 'अ बिब्लिओमॅट्रिक स्टडी ऑन पर्चेस अँड टेक्नोलोंजि ट्रान्स्फर विथ रेफरन्स टू इंडस्ट्रिअल इक्विपमेंट्स' हा शोधनिबंध, केंब्रिज सायंटिफिक सारांश आणि स्कोपस अनुक्रमित जर्नल – ''जर्नल ऑफ कॉम्प्यूटेशनल अँड थिअरॉटिकल नॅनोसायन्स'' मध्ये एच-इंडेक्स ४५ सह प्रकाशित झाला.

४-५ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) समितीने 'युवा मोरया' (मुंबई / ठाणे येथील स्वयंसेवी संस्था) यांच्या सहकार्याने कपडे दान मोहिमेचे आयोजन केले.



५ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आयक्यूएसी आणि आयआयसी समितीच्यावतीने डॉ. स्मिता जपे यांनी

डॉ. प्रीती शिरोडकर यांचे (नवसंकल्पना आणि उद्योजकता या अनुषंगाने), ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अभिमुखता'' या विषयावर आधारित वेबिनारचे आयोजन केले.




५ डिसेंबर : डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि श्री. वैभव पंडित यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आयक्यूएसी व व्यावसाईक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) समिती तर्फे महिंद्रा ग्रुपच्या (व्यावसायिक शाश्वतता विभागाचे) जनरल उपव्यवस्थापक डॉ. प्रदीप पणीग्राही, यांचे ''शाश्वत पर्यावरण : व्यावसायिक आणि व्यक्तिगत भूमिका'' या विषयावर आधारित वेबिनारचे आयोजन केले.





७-११ डिसेंबर : विद्यालंकार इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे आयोजित 'एआयसीटीई अटल्स' च्या डिझाइन थिंकिंग वरील ५ दिवसांच्या 'प्राध्यापक विकास' कार्यक्रमाला (एफडीपी) प्रा. कृणाल के. पुंजानी उपस्थित राहिले.

९ डिसेंबर : पीजीडीएम शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी डी.आर. व्ही.एन. ब्रिम्सचे संचालक, डॉ. नीतिन जोशी यांचे 'करिअर प्लॅनिंग' या विषयावर एक सत्र आयोजित करण्यात आले. या सत्राचे संचालन प्रा. कंचन अक्षय यांनी केले.




११ डिसेंबर : वैभव पंडित आणि प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आयआयसी समितीच्या वतीने कॅटलिया टेक्नोसिस प्रा. लि. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) बद्रीनाथ राव यांचे 'प्रोसेस ऑफ इनोव्हेशन डेव्हलपमेंट' या विषयावरील वेबिनार आयोजन करण्यात आले.





११ डिसेंबर: डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी विद्यार्थी समितीच्या सहकार्याने ऑनलाईन ब्रिम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले.





१४-१९ डिसेंबर: डॉ.स्मिता जपे आयसीएसएसआर डब्ल्यूआरसी आणि वाणिज्य विभाग, मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित पाच दिवसांच्या 'प्रगत संशोधन कार्यक्रमात' सहभागी झाल्या.

१५ - १६ डिसेंबर : विद्यावर्धक अभियांत्रिकी महाविद्यालय, मैसूर तर्फे आयोजित २ दिवसांच्या ''शोध निबंध आणि अहवाल लेखन'' या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय कार्यशाळेला प्रा. कृणाल के. पुंजानी उपस्थित राहिले.

१६ डिसेंबर : प्रा. संदीप मोघे ''अॅडपटिंग टू न्यू वेज टू युअर वर्क विथ डेल'' या वेबिनारला उपस्थित राहिले.

१७ डिसेंबर : प्रा. कृणाल के. पुंजानी यांना, मुंबई व इतर विविध संस्था व महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांच्या २६ प्रतिस्पर्धी पथकांमधून ब्रिम्सच्या विद्यार्थी पथकाला मिळालेल्या ''बीएमए इनथॉन आणि दांडेकर मेमोरियल ट्रॉफी'' प्रथम पुरस्कारासाठी यशस्वीपणे मार्गदर्शन केल्याबद्दल प्रमाणपत्र मिळाले.




१९ डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली यांनी २०२०-२१ च्या तुकडीतील खालील विद्यार्थ्यांना ३.७५ लाखांच्या पॅकेजसह भारतातील सर्वोच्च आणि अग्रगण्य निर्यातदार संस्था (१८६५ मध्ये स्थापन केलेल्या - १००० कोटी पेक्षा अधिक उलाढाल असलेल्या) अल्लाना सन्स प्रायव्हेट लिमिटेड मध्ये रोजगार संधी मिळवून दिल्या.

मनाली यादव, पीजीडीएम ऑपरेशन्स

प्रियंका शिंदे, पीजीडीएम ऑपरेशन्स


१९ - २० डिसेंबर : डॉ. नीतिन जोशी 'कारकीर्दीच्या मधल्या टप्प्यातील संकटे' या विषयावरील कार्यक्रमास उपस्थिती राहिले.

२१-२९ डिसेंबर : प्रा. महेश भानुशाली, मुंबई विद्यापीठाच्या पीएचडी कोर्स वर्क परीक्षेला उपस्थित राहिले व यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले.

२१ डिसेंबर : प्रा. कंचन अक्षय यांनी पदवीधर विद्यार्थ्यांसाठी 'व्यवसाय मार्गदर्शन' या विषयावर वेबिनार आयोजित केले.

२४ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आयआयसी समितीच्यावतीने डॉ. स्मिता जपे यांनी अॅडव्होकेट रुपाली येरानाईस यांचे ''बौद्धिक संपदा हक्क'' या विषयावरील वेबिनारचे आयोजन केले.





२५-२७ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या कर्मचारी विकास समिती व क्रीडा समितीच्यावतीने सायकलिंग आव्हान आयोजित करण्यात आले होते. खालील सहभागींनी ३ दिवसात एकूण १०० कि. मी. अंतर सायकलिंग करण्याचे आव्हान पूर्ण केले.



**डॉ. नीतिन जोशी**



**श्री. परेश शिगवण**



**श्री. किशोर वाघमारे**



**श्री. दर्शन कोळी**

२८ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आयआयसी समितीच्यावतीने प्रा. विभूती सावे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी 'जुगाड छायाचित्रण स्पर्धा' आयोजित केली.

२९ डिसेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आयआयसी समितीच्यावतीने प्रा. विभूती सावे यांनी सुश्री मुग्धा चौधरी यांचे उद्योजकतेच्या विकासाचे टप्पे या विषयावर आधारित वेबिनारचे आयोजन केले.

२९ डिसेंबर: डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी जर्नल क्लब मध्ये 'शैक्षणिक नियोजन' या विषयावर सादरीकरण केले.

प्रा. कंचन अक्षय यांनी प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण निकड ओळखण्यासाठी (ऑनलाईन ट्रेनिंग नीड आयडेंटिफिकेशन) उपक्रम केला.

ब्रिम्सच्या आयआयसी समितीच्यावतीने प्रा. कृणाल के पुंजानी यांनी 'इनोबीज' – इनोव्हेशन स्पर्धा (डिसेंबर) आयोजित केली आणि त्यांच्या कार्यवाहीसाठी मार्गदर्शक प्राध्यापकांशी समन्वय साधला आणि सर्व संघांचे मूल्यांकन करण्यासाठी परीक्षकांशी समन्वय साधला.

डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि डॉ. स्मिता जपे यांचा "क्रायसिस मॅनेजमेंट स्टॅटेजीज टू मिटिगेट द ग्लोबल कोविड-१९ पॅनडॅमिक : द इंडियन सिनॅरिओ" या विषयावरील शोधनिबंध यूजीसी मान्यताप्राप्त नियतकालिक – (यूजीसी केअर लिस्ट) जर्नल ऑफ आर्टस्, ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस (आय एस एस एन-२२२९-३६२०) मध्ये प्रकाशित झाला.

डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी आयक्यूएसीच्यावतीने १५ विद्यार्थ्यांना आयबीएम-पी-टेकच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी नोंदणीकृत केले.







**स्कोपस आणि ए बी डी सी अनुक्रमित नियतकालिकाचे समीक्षक / परीक्षक**

| Faculty | Journal | Papers Title |
|---|---|---|
| Dr. Nitin Joshi | International Journal of Business Innovation and Research | Sustainable Transport: Co-creation of business with customer perceived values |
| Dr. Smita Jape | Indian Journal of Finance and Banking | Prediction of Corporate Bankruptcy using Financial Ratios and News and Deposit Insurance Coverage Limit : How Much Is Enough? Evidence From India |
| Dr. Meenakshi Malhotra | Energy Research Social Science | The effects of the policy mix on firms' diversification strategies |

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.